विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१९** |
| **वर्ष** | **:** | **त्रेपन्नावे** |
| **अंक** | **:** | **चौथा** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१९

## गणपत्रिका क्रमांक : १९८

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : त्रेपन्नावे अंक : चौथा मार्गशीर्ष/ पौष १९४० जानेवारी २०१९

## संपादकीय

### व्यवस्था परिवर्तन आणि त्याचे परिणाम

१८५७-५८ साली आपण इंग्रजांच्या वसाहतवादाविरुद्ध बंड पुकारले. या बंडामध्ये आपला पराभव झाला असला तरीही; ईस्ट इंडिया कंपनीचे आधिपत्य संपले आणि इंग्लडच्या राणीचे राज्य चालू झाले. बरोबर १०० वर्षाआधी, प्लासीच्या लढाईमध्ये रॉबर्ट क्लाइव्ह विजयी झाला, आणि ईस्ट इंडिया कंपनीकडे आपली प्रशासकीय सूत्रे हस्तांतरीत व्हायला लागली. व्यापाराकरता आलेले इंग्रज, या नवीन जबाबदाऱ्याही तेवढ्याच कुशलतेने हाताळायला लागले. पोर्तुगीज, डच, फ्रेंच हे सगळेच व्यापाराकरता भारतात आले, आणि वखारींच्या निमित्ताने हातापाय पसरु लागले. १७५७ साली तोही विषय संपला व इंग्रजांचा वसाहतवाद चालू झाला.

वॉरन हेस्टींग हा कंपनीचा पहिला गव्हर्नर जनरल. आपल्या प्रशासकीय व्यवस्थेकरता त्याने एक अत्यंत महत्त्वाचे धोरण अवलंबले होते. भारतीयांवरती राज्य करायचे ते त्यांच्याच सामाजिक, सांस्कृतिक, आणि धर्मविषयक संकल्पनांना अनुसरून करायचे. पाश्चिमात्य भाषा, विचार व संस्कृती ही त्यांच्यावर लादायची नाही. अर्थातच ख्रिस्ती धर्मप्रसारकांकरता ही बाब फारशी अनुकूल नव्हती.

दक्षिणेप्रमाणे उत्तरेकडेही काही ख्रिस्ती धर्मप्रसारक आले असले तरी लंडनमधील इंग्रज सरकार मात्र त्यांना तशी परवानगी देत नव्हते. १८ व्या शतकाच्या शेवटी व १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी या संदर्भात इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये व बाहेर या धोरणाविरुद्ध चळवळी चालू केल्या. हिंदू धर्म, आणि त्याच्या सर्व चालीरिती या अतिशय मागासलेल्या आहेत; त्यांचा भौतिक व

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), कामे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| गीतकृष्णायन-भाग ५- कुरूक्षेत्र | ५ |
| मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम | ८ |
| निरोगी जीवनाचे रहस्य | १६ |
| काल भैरव अष्टक | १७ |
| ॐ तत् सत् | १८ |
| रुद्राक्ष | २३ |
| प्राचीन ऋषींचे मानव जातीला उपकारक मौलिक संशोधन | २५ |
| 'डावा पाय पुढे' असण्यासंबंधी | २७ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)/ ऐच्छिक देणगीदार**

श्री. शरद तांबे, चेंबूर - रु. १०००/-
श्री. कमलाकर अनंत कानडे, ठाणे - रु. १०००/-
श्री. विवेक श्रीराम भोपटकर, देवरुख - रु. १०००/-
श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे - रु. १०००/-
श्री. विजय नारायण महाजन - रु. १०००/-+१०००/-

**- संपादक**

परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येईल.

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३७ वा

**तथापि नीचमार्गेण हन्त यात्युदकं कथम्?**[४०७]

अरेरे, पाणी उतार मार्गाने कसे निघून जाते.

पहिली ओळ : प्रकृत्या शीतलं स्वच्छं पावनं सर्वजीवनम्।।

पाणी स्वभावतः थंड स्वच्छ असते. सर्वांना पवित्र करते. पण ते उतार मार्गाने कसे निघून जाते?

एखादा चारित्र्यसम्पन्न मनुष्य अधोगतीला गेला तर वरील दृष्टान्त देतात.

**तस्मै तदैव दातव्यं, यस्य यत् सुखं भवेत्।**[४०८]

त्याला तेच द्यावे जे त्याला सुखकर होईल.

दुसरी ओळ : दुग्धे क्षिप्रा न जीवन्ति मत्स्या अभ्युद्धृता जळात्।।

पाण्यापेक्षा दूध उच्च, पण त्यात मासे सोडले तर ते जिवंत राहतील का?

**तस्माच्छेषं न रक्षयेत्।**[४०९]

कोणतीही गोष्ट अर्धवट शिल्लक ठेवू नये. एकदाच तिचा नायनाट करून टाकावा.

संपूर्ण श्लोक :

**ऋणशेषश्चाग्निशेषः शत्रुशेषस्तथैव च।**
**पुनः पुनः प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न रक्षयेत्।।**

कर्ज अर्धवट ठेवू नये. (व्याजामुळे ते वाढते.) अग्नी पूर्ण विझवावा. (अनपेक्षित पसरु शकतो.) शत्रूचा पूर्ण पराभव करावा. कालांतराने तो डोके वर काढतो.

**तिष्ठति नः काञ्चनो मेरुः।।**[४१०]

अहो, तो सोन्याचा मेरू पर्वत ना? तो आमचाच आहे.

संपूर्ण श्लोक :

**यद्यपि धनेन धनिनः क्षितितलनिहितेन भोग–रहितेन**
**तस्माद्वयमपि धनिनः**
**तिष्ठति नः काञ्चनो मेरुः।।**

भरपूर धन आहे म्हणून त्याला धनवान म्हणायचे का? तो जर त्या धनाचा उपभोग घेत नसेल तर आम्हाला सुद्धा धनवान म्हणावे लागेल. आमच्या मालकीचा तो सोन्याचा मेरू पर्वत आहेच.

**तस्मात् कृपणमाश्रये।**[४११]

लक्ष्मी म्हणते म्हणून मी कंजूष माणसाचा आश्रय घेते.

कोणीतरी लक्ष्मीला विचारले, तू कंजूष माणसाचा आश्रय का घेतेस? तिने उत्तर दिले, ‘शूरं त्यजामि वैधव्यात् मी जर शूराचा आश्रय घेतला तर त्याला रणांगणावर मरण येईल व मी विधवा होईन.

(पृष्ठ ७ वर)

## गीतकृष्णायन
## भाग ५ . कुरूक्षेत्र

प्रसाद औटी

**पुत्रशोक' – जाती कोकिला**

पांडवा, सत्य काय ते सांग ॥ धृ ॥

सुतप्राणांची ज्योत निमाली
वार्ता लढता कानी आली
दुःखाच्या रे मीही बुडतो
गर्तेमाजि अथांग ॥१ ॥

अश्वत्थामा चिरंजीव तो
कोण तयाला समरी वधतो
दुष्ट मनाने तरी लावली
कुविचारांची रांग ॥ २ ॥

रणी झुंजता वीरगतीला
असेल तो जर खरा पावला
पुत्राच्या शोकाने विव्हल
द्रोण आज विकलांग ॥३ ॥

शिष्योत्तम तू धर्मपरायण
सत्य बोलणे हेची जीवन
आज बोलुनी सत्याला तू
फेड गुरूचे पांग ॥ ४ ॥

धर्म उत्तरला, तात, मी शपथपूर्वक सांगतो, अश्वत्थामा खरंच मेलाय!

पुत्रवियोगाच्या कल्पनेनं खचलेल्या द्रोणांचा वध करणं मग पांडवांना अवघड गेलं नाही!

त्यांच्या पश्चात दुर्योधनानं सेनापतीपद कर्णाला बहाल केलं. सन्मानीत कर्ण गर्वानं आश्वासला, दुर्योधना, मुळावर घाव घातला की फांदया आपोआप खाली येतात. माझा धनुर्विदयेतला प्रतिस्पर्धी अर्जुन मी सर्वप्रथम ठार करतो. एकदा अर्जुन मेला की पूर्ण पांडवसैन्याचा नाश करायला आपल्याला कितीसा वेळ लागेल?

पण अर्जुनानंच पहिल्या दिवशी कर्णाला पराभूत केलं. चिडून कर्णानं मग आपल्या रथाच्या सारथ्यासाठी मद्रराज शल्याचं सहाय्य घेतलं आणि अर्जुनावर तो नव्या दमानं चालून गेला. त्याच्या कौशल्यानं कृष्णही स्तिमित झाला. त्याचा एक बाण तर खुद्द कृष्णाला आपल्या मुकुटावर झेलावा लागला! उत्तेजित झालेल्या अर्जुनानंही मग आपण कच्च्या गुरूचे चेले नाही हे सप्रमाण दाखवून दयायला सुरूवात केली. दोन सर्वोत्तम धनुर्धरांमधला तो संघर्ष कळसाला जाऊन पोहोचत होता! आणि अचानक...

अचानक कर्णाच्या रथाचं चाक जमिनीत रुतून बसलं! जंग जंग पछाडूनही ते निघेना! गतीहीन रथावर शरवर्षाव करणं अर्जुनाला फारच सोपं जाईल हे कर्णानं जाणलं आणि प्रतिस्पर्ध्यावर तो अगतिक असताना वार करणं धर्माला धरून होणार नाही असं तो अर्जुनाला सांगू लागला...

**'क्व ते धर्मस्तदा गता' – जाती हरिभगिनी**

कुरुक्षेत्रावर चाक रथाचे जमिनी रुतता कर्ण वदे
युद्धा पुनरपि लढण्या आधी रथचक्रा मज उद्धरु दे

कृष्णा पार्था जर ही संधी मजला तुम्ही नाहि दिली
निंदतील जन संधी धर्मा आचरण्याची घालविली
॥१॥

ऐकोनी त्या वचना केशव स्मितवदने प्रतिप्रश्न करी
आपत्काली असता कर्णा आठवतो तुज धर्म जरी
गुंतवुनी कपटी द्युती जव दुर्योधन तो राज्य हरी
राधेया मज सांग कुठे तव गेला तुमचा धर्म तरी
॥ २ ॥

बुद्धिभेद तू अमुचा करशी पाजळुनी ज्ञानहि मोठे
पांचालीचे वस्त्र फेडता होता तुमचा धर्म कुठे
वीषान्ना चारुन भीमा जरि सर्प डसवण्या ना भ्याला
सांग मला कौंतेया त्या तुज धर्म कसा आठव
झाला ॥ ३ ॥

पांडव जीवां हरण्या जेव्हा लाखेचे घर पेटवले
सांग तेधवा कुठल्या धर्मा राधेया त्वां आचरले
अभिमन्यू रणी निशस्त्र होता घेरुन सर्वांनी वधला
समयी त्या विस्मृत ज्या धर्मा आज अचानक का
स्मरला ॥ ४ ॥

पांडवकीर्ती राखण्यास उपदेश अम्हाला जर करसी
का न स्वये तो विचार केला ते करताना वनवासी
पार्था उचली गांडीवा तू बेशक वर्मी वार करी
दुष्टांना वधण्याहुन उत्तम असे न दुसरा धर्म परी
॥५॥

एका सायकपुंख बाणाने अर्जुनाने कर्णाला यमसदनाची वाट दाखवली. दुर्योधनाचा शेवटचा आधार, शेवटची आशा कुरूक्षेत्रावरच्या रक्तरंजित धुळीत मिसळली.

आता दुर्योधनाच्या पक्षातले सारे अतिरथी, महारथी वधले गेलेले आहेत. पितामह भीष्म निर्याणाची वाट पहात शरपंजरीवर हरिचिंतन करत स्वस्थ पडून आहेत. द्रोण, जयद्रथ, कर्ण, स्वतःचे सख्खे भाऊ, सारे सारे मृत्युमुखी पडलेले आहेत. त्यांचे आप्त रणांगणावर पडलेल्या त्यांच्या शवांना कवटाळून विलक्षण आक्रोश करतायत, दुर्योधनाला नानापरींनी दूषणं देतायत, बोल लावतायत.

दुर्योधन स्वतः असहाय्य झालाय, गलितगात्र झालाय, हतबल झालाय. त्याच्या शरिरावर युद्धात झालेले असंख्य घाव आहेत. त्याचं मन सुन्न झालंय, भ्रमिष्ट झालंय. त्याची बुद्धी तर त्याला केव्हाच सोडून गेल्येय. आपण हे काय केलं असा विचार क्वचित त्याच्या मनाला चाटून जातोय. यापुढे काय करावं हे त्याला सुचत नाहीये. तो आता एकटा पडलाय. अगदी एकटा!

अचानक एक अनामिक भिती त्याला घेरून टाकते. दशदिशाच जणु त्याला खायला उठतात. त्याला श्वास घेणंही जड होतं. कशापासून तरी, कुठेतरी, कायमचं पळून जावं असं त्याला तीव्रतेनं वाटू लागतं. त्या घुसमटलेल्या अवस्थेत तो वाट फुटेल तिकडे वेडयासारखा पळत सुटतो. पांडव आपल्या मागून पाठलाग करत येतायत, कुरूक्षेत्र आपल्याला सोडत नाहीये, रणात मारल्या गेलेल्या सर्वांचे कुटुंबीय आपल्याला जाब विचारायला आपल्या मागून धावतायत, स्वतः कृष्ण सुदर्शन घेऊन आपल्या मागावर येतोय, आपली सर्व पापं जिथे जाऊ तिथे आपला पाठपुरावा करत येतायत, आपण आयुष्यभर

केलेले अन्याय जबडा पसरून विकट हास्य करत आपलीच आहुती मागतायत असे एक ना अनेक भास त्याला होऊ लागतात.

धावता धावता त्याला समोर जलाशय दिसतो. धापा टाकत, अर्धवट गुदमरलेल्या अवस्थेत तो जलाशयात शिरतो. पारध होऊ घातलेल्या जखमी वन्य श्वापदासारखा कावराबावरा होऊन जीवाच्या भितीने अंग चोरून लपून बसतो. यधाड् धाड्फ असा आवाज कुठून तरी त्याच्या कर्णपटलांवर सतत आदळत असतो.

त्या बेभान आणि भयाकुल अवस्थेत तो आवाज आपल्या बेगुमानपणे उडणाऱ्या काळजाचा आहे हेदेखील त्याच्या लक्षात येत नाही...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●



(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

उदारंलज्जया पुनः- उदार माणसाचा मी आश्रय केला तर तो अंगावरचे वस्त्र सुद्धा दान करून टाकील. मग मी लाज कशी राखू? सापत्न्यात् पण्डितमपि न आश्रयामि- पण्डित माणूस सतत माझ्या सवतीचे म्हणजे सरस्वतीचे ध्यान करतो म्हणून मी कंजूषाचा आश्रय करते.

**तथा नीचः स्वयमाश्रयं (हन्ति)।।**[४१२]

नीच मनुष्य स्वतःला मिळालेले आश्रय स्थानच नष्ट करून टाकतो.

**दृष्टान्त – यथा गजपतिः श्रान्तः**
**छायार्थी वृक्षमाश्रितः**[४०७]
**विश्रम्य तु तं द्रुमं हन्ति**
**तथा नीचः रचमाश्रयम्।।**

हत्ती श्रेष्ठ थकल्यावर विश्रांतीसाठी महावृक्षाचा आश्रय घेतो व विश्रांती घेऊन झाल्यावर त्या झाडाची नासधूस करून टाकतो.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

भारतीय जीवनात श्रीप्रभुरामचंद्र व भगवान श्रीकृष्ण यांना अनन्यसाधारण अधिष्ठान पूजनीय, वंदनीय, आदर्श, अनुसरणीय म्हणून जेवढे आहे तेवढे अन्य कोणाही देवी देवता वा अन्य ईशावतरांना नाही हे लक्षात घ्यावे. श्रीशंकर, दुर्गादेवी आदींचेही अवतार झाले. पण खल/दानव/असुरांचे पारिपत्य एवढाच त्यांचा हेतू होता. समाजजीवनावर त्या अवतारांचे अन्य विधायक परिणाम झाले नाहीत जेणेकरून समाजात काही लक्षणीय ठसा उमटला. जसा या दोन अवतारांचा उमटला. आसेतू हिमाचल समाजावर या अवतारांनी लक्षणीय परिवर्तन घडवण्याचे कार्य केले, त्यामुळे समाजाने त्यांना जीवनात अक्षय स्थान दिले. महाभारत व रामायण हे ग्रंथ त्यामुळेच भारतीय जीवनप्रणालीत अविभाज्य घटक आहेत आजतागायत. हे दोन्ही भगवान श्रीविष्णूंचे अवतार, पुराणात सात चिरंजीवांचा उल्लेख आहे पण खऱ्या अर्थाने हेच दोन अवतार जनमानसात चिरंजीव आहेत ते त्यांचे कार्यामुळे हे लक्षात घ्यावे. जरी ते देहत्यागून श्रीविष्णूरुपात विलीन झाले तरी कार्यारूपाने अजरामर राहिले. जे सात चिरंजीव आहेत त्यांचे आज काहीही दर्शन/प्रत्यय/परिणामकारक कृती समाजात घडलेली नाही जेणेकरून समाजाची प्रगती रोखणाऱ्या अपप्रवृत्ती त्यांनी नष्ट करून समाज सुधारला. म्हणून त्यावर भाष्य करणे नको, समाजात ना त्यांची अमर प्रतिमा ना काही एक दोन चिरंजीवांची थोडी मंदिरे सोडता अन्य काही.

आज भारतीय जीवनात 'रामराज्य' म्हणून एक संकल्पना दृढ आहे. भगवान श्रीकृष्णांनी राज्य केले नाही. कंस वधानंतर ते राज्य त्यांनी योग्य त्या व खऱ्या हक्कदारांचे स्वाधीन केले. द्वारकेवरही ते थोरल्या बंधूचेच अधिपत्याखाली राहिले. त्यांचे अवताराचे वेळचे युग वेगळे होते व त्या युगानुरुप असा धर्ममार्ग त्यांनी आचरला व तोही जनमानसात 'गीता' रुपाने स्थान प्राप्त करता झाला व हे त्यांचे तत्त्वज्ञान व नीति यामुळे त्यांची प्रतिमा 'पूर्णावतार' म्हणून जनमानसात स्थान मिळवून गेली. तरी 'रामराज्य' ही संकल्पना/प्रतिमा अबाधित अक्षय राहिली याचे कारण श्रीप्रभूरामचंद्रांचे लोकोत्तर आदर्श, मर्यादात्मक जीवन म्हणूनच या लेखांत त्यांच्या या लोकोत्तर गुणांची मीमांसा/ वर्णन मी यथा अल्पमती करीत आहे. त्यातील त्रुटी वा उणीवा माझ्या नेपाळेपणामुळे त्यामुळे क्षमेस पात्र आहेत. तरी विद्वान अभ्यासकांनी त्या पदरी घ्याव्या ही विनंती.

भगवान श्रीप्रभूरामचंद्र हा भगवान श्रीविष्णूंचा ७वा अवतार. ''यदा यदाही धर्मस्य... संभवामी युगे युगे'' याप्रमाणे त्यावेळी अधर्मी राक्षसी वृत्तीचा प्रचंड प्रभाव झाल्यानेच धर्मरक्षण, सज्जनरक्षणार्थ व समाजाची विस्कटलेली चौकट पुन्हा स्थापित

करण्याचे कार्यार्थ हा अवतार झाला आहे. त्याविषयी अधिक भाष्य न करता, त्यांचे लोकोत्तर गुण बघू या.

'पुरुषोत्तम' याचा अर्थ 'उत्तम पुरुषाचे सर्व गुण अंगी असणारा''. याचा अर्थ प्रत्येक कृती / व्यवहार यांच्या धर्मनीतीशास्त्राने ज्या सीमा आखल्या आहेत त्यांचे उल्लंघन न करता त्या बंधनाचे चौकटीत राहून वर्तन करणारा. श्रेष्ठ आदर्श कर्तव्य कोणते हे जाणून त्यासाठी दुसऱ्या कर्तव्याचा अहंकार, गुर्मी, प्रतिष्ठा यांचे आहारी न जाता त्याग करणारा खरा आदर्शवादी तोच खरा 'मर्यादा पुरुषोत्तम'.

श्रीप्रभूरामचंद्राचे जीवन 'बालपण ते निर्वाणक्षणापर्यंत उत्तम गुणांचे तंतोतंत पालन करून समस्त मानवजातीला 'आदर्श जीवनाचा पाठ' देणारे होय. या मार्गावर त्याप्रमाणे जे जे चालते ते ते आदर्श पुरुष म्हणून लौकिक पावले आहेत ते लक्षात घ्यावे.

ते अवतारी पुरुष आत्मिक दैवी शक्ती युक्त होते म्हणून त्यांचे जीवन सरळ, सोपे, सुखमय, यशस्वी होते असे नाही तर त्यांच्याही मार्गात अनेकविध विघ्ने, संकटे, विरोध इ.इ. मोठ्या प्रमाणावर आली पण त्यावर त्यांनी विवेकबुद्धी, चातुर्याने, माणुसकीच्या सीमा पाळून मात केली. प्रथम त्यांचे गुण विचारात घ्यावे लागतात ते आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श मित्र व आदर्श पती हे होत. मातापित्यांची आज्ञा त्यांनी सदैव शिरोधार्थ मानली. सावत्र मातांना त्यांनी आपल्या मातेएवढाच सन्मान दिला. तसेच सावत्र बंधूंनाही सख्या भावाएवढेच प्रेम दिले. ज्येष्ठ बंधू म्हणून त्या कनिष्ठ भावांवर त्यांनी कसलीही व कधीही दडपशाही केली नाही त्यामुळे भाऊबंदकी हा प्रकारच अस्तित्वात येऊ शकला नाही. ज्येष्ठांचे आज्ञा पालन त्यांनी तत्परतेने केले. गुरुंची आज्ञा शिरोधार्थ मानली व गुरुंची मनोभावे सेवा करून विद्या संपादन केली व आदर्श शिष्य ही प्रतिमा निर्माण केली.

राजपुत्र म्हणून त्यांनी दास, दासी, सेवक वर्ग यांना सन्मानाने वागवले तसेच प्रजाजनांनाही. त्यामुळे जनमानसात त्यांनी आदराचे स्थान प्राप्त केले व प्रजेलाही लोककल्याणकारी जनहीत तत्पर असा राजा पुढे मिळणार याचा विश्वास उत्पन्न होऊन ती निर्धास्त झाली, हे पण आदर्शत्वाचे लक्षण. कारण या वर्तणुकीतच त्यांनी मानवता गुणाचा प्रत्यय दिला. राजपुत्र म्हणून घमेंड, अहंकार, उद्दामपणा, अरेरावी, हुकुमशाही इ. अवगुणांनी त्यांनी आपली दहशत निर्माण केलीच नाही कारण या दुर्गुणांचा लवलेशही त्यांच्यात नव्हता.

त्यावेळीही राक्षस लोक तपस्वी मुनींना तसेच त्यांच्या यज्ञयागात विघ्ने आणून त्यांना त्रास देतच शिवाय त्यांच्या हत्याही करीत. आश्रम नष्ट करीत असत. अघोरी शक्ती प्राप्त झालेले हे दानव उन्मत्त झाले होते व ऋषिमुनींना जगणे, धर्माचरण करणे यासाठी समर्थ क्षत्रिय राजांना साकडे घालावे लागे व संरक्षण मागावे लागे व तसा राजाश्रय न मिळाल्यास हतबलतेने जगावे लागे. अस्त्रशस्त्र संपन्न क्षत्रिय राजे त्यावेळी फार

कमी होते कारण असुरांच्या अघोरी दुष्ट शक्तींना परास्त करणे सोपे नव्हते. तसेच ते असूर मायावी शक्तिसंपन्न होते. विश्वामित्रांनी दशरथ राजाकडे राम, लक्ष्मण या युवराजांची यज्ञ संरक्षणासाठी मागणी केली व त्याप्रमाणे त्यांनी परवानगी देताच पित्राज्ञेप्रमाणे त्यांनी यज्ञविध्वंसक राक्षसांना नष्ट करून विश्वामित्रांचा यज्ञ निर्विघ्न केला व त्यांची कृपा व आशिर्वाद घेतले. आत्मशक्तिविश्वास व विवेकपूर्ण अस्त्र योजनेमुळे त्यांनी हे कार्य पार पाडले. भीतीचा लवलेशही त्यांचे मनात आला नाही कारण कार्य महत्त्वाचे आहे व स्वबलावर विश्वास असल्याने त्यांनी यश संपादले. क्षात्रधर्म पालन करून खलनिर्दालक हे ब्रीद सार्थ केले.

येथे हे लक्षात घ्याव की त्यांनी त्यावेळी समस्त असूर जातीविरुद्ध मोहिम उघडून ती नष्ट करून टाकून असूरविरहीत (निःअसूर) पृथ्वी केली नाही. ही विवेक मर्यादा श्रीरामांनी त्यावेळी पाळली कारण समस्त असूर खल नसतील त्यातील जेवढे उन्मत्त त्यांचे समूळ पारिपत्य करून अन्य असूरांना एक संदेशही दिला की त्रास दिल्यास नष्ट करणारी शक्ति आहे याचे भान ठेवावे.

विवेक मर्यादायुक्त क्षात्रधर्मपालन हा श्रीरामप्रभूंचा गुण शत्रूंनाही त्यांचेबद्दल आदर वाटणारा. आदरयुक्त, विवेकाने वागून जिंकले व त्यांचेकडून वैष्णव धनू ही प्राप्त केले. येथे त्यांचा संयम दिसतो व विवेक दाखविल्यास अनुचित संघर्ष टळतात व शत्रूही त्याची चूक कळल्याने मित्र बनतात वा संघर्ष सोडतात याचे उदाहरण श्रीरामांनी दिले, आपल्या वर्तणुकीने. हा आदर्श फार मोठा आहे.

कैकेयीने राजा दशरथाला वरदानाचे कोंडीत पकडून श्रीरामांना १४ वर्ष वनवासात पाठविण्याची आज्ञा देण्यास भाग पाडले. त्यावेळी पित्राज्ञेप्रमाणे मानून त्यांनी वल्कले धारण करून अनुज लक्ष्मण व पत्नी सीता यांचेसह वनवासासाठी प्रयाण केले. जातांनाही त्यांनी कैकेयीचे आशिर्वाद घेतले. कोणताही वादविवाद, हक्कासाठी उपस्थित केला नाही. तसेच पित्याची अगतिकता जाणून आज्ञा पालन केले. पितृवचनी आदर्श पुत्र ही प्रतिमा निर्माण केली. नागरिकांनाही समजावून परत पाठविले व लक्ष्मणसीतेसह दण्डकारण्यात निवास केला. वनवासी जीवन, पर्णकुटी निवास असे खडतर जीवन आनंदाने स्वीकारले व आनंदाने व्यतीत करू लागले. भरतासही त्यांनी पादुका देऊन परत पाठविले व चौदा वर्षानंतर भेटण्याचे वचन देतांनाच राज्यकारभार उत्तम संयमी न्यायाधर्मनीतिनुसार करण्यास सांगून कर्तव्य प्रधानता शिकवली. तसेच कैकेयी मातेसही सन्मानाचीच वागणूक देणेस सांगितले. रघुकुलनीतिचा उपदेश केला. ज्येष्ठ बंधू म्हणून त्यास सुयोग्य प्रबोधन केले व आदर्श बंधुत्वाची समाजास जाणिव करून दिली. आदर्श बंधुत्वाचे हे उदाहरण श्रेष्ठ होय.

वचनपूर्तीच्या आड कोणतीही माया, ममता, मोह येवूच शकत नाही व वचनभंग करण्यास भाग पाडू शकत नाही हे यावरून सिद्ध होते. वचनपूर्तीची मर्यादा तंतोतंत पालन करताना विकारांवर विवेकाने नियंत्रण ठेवावे

हा आदर्श दाखविला. हे वचनपूर्ती कर्तव्य पालन करतांना संयम व नीती प्रत्ययास आणून दिली. ''रघुकुलरिती सदा चली आयी, प्राण जाय पर वचन न जायी।'' हे यामुळेच जनमानसात दृढ झाले.

दण्डकारण्यात शबरीची उष्टी बोरे खातांना त्यांनी तिच्या सद्‌भावनेला प्राधान्य दिले. ती भावनाच सर्वोच्च मानली व थोर मानवतावादाची प्रचिती दिली. अहिल्येचा उद्धार हे कार्यही याच मानवतावाद प्रचितीचे.

शूर्पणकेचे नाक, कान कापण्यापूर्वी आज्ञा दिली तिचे मागे हेतू शुद्ध होता. कोणत्याही स्त्रीने दुसऱ्या पुरुषाचे स्त्रीस भक्षण करून (राक्षसी स्त्री) स्वतः त्या पुरुषाचे पत्नी बनण्याचा कुटील हेतू करू नये व त्याचे जीवन उध्वस्त करू नये. स्त्री असली तरी अनीतिचे वर्तन केल्यास दंडनीय आहे. न्यायदान सर्वांना सारखेच मिळते फक्त राज्यकर्ता नीतिमान असल्यास हा संदेश श्रीरामांनी दिला. अधर्माचरण कोणीही केले तरी दंडनीयच मग स्त्री असो वा पुरुष तेथे भेदाभेद नाही. शासन वा दण्ड अधर्माचरणाचे प्रमाणानुसार दिला जातो. असूर स्त्री जातीला हा एक इशाराच त्यांनी दिला.

सीतेचे रावणाने हरण केल्यानंतर त्यांचा विलाप उत्तम पत्नीप्रेमाचे उदाहरण आहे. वास्तविक लक्ष्मणाने आखून दिलेली लक्ष्मणरेषा पार केल्याने हे घडले व लक्ष्मणास का तेथून जावे लागले व मायावी राक्षसाने मरणसमयी काढलेली त्यांची आवाज नक्कल हे लक्षात आल्यावर त्यांनी लक्ष्मणास दोष दिला नाही. विवेकबुद्धीने संयम व परिस्थिती आकलनाने निर्णय घेण्यास हे उदाहरण आहे.

'जटायू'ने दिलेला रावणाशी लढा व त्यात पंख छेदनाने मृत्यूशी झुंज देत असतांना श्रीरामांशी भेट व त्याला सन्मानाने गौरवून त्याचा अंत्यविधी करून श्रीरामांनी पराक्रमाचा गौरव केला. त्याचे वीरमरण त्यांनी सार्थकी लावले. सैनिकांचा गौरव करण्याचा राजाचा आदर्श त्यातून दिसतो.

श्री हनुमतांशी भेट व त्यातून सुग्रीवाशी मैत्री व त्यावरील अन्याय दूर करण्यासाठी केलेला वाली वध या घटनांतून श्रीरामांचे प्रामुख्याने दिसणारे गुण म्हणजे सन्मित्रता व मित्राला अन्याय दूर करणेस केलेले साहाय्य. वानरसेनाधिपती व राजा म्हणून त्यांनी सुग्रीवास वालीचे वधानंतर राज्यपदी बसविले. पण त्याचबरोबर तो विलासक्रीडेत रममाण होऊन त्यास वचनाचा पडलेला विसर पाहून लक्ष्मणाकरवी त्यास कडक समज देवून कर्तव्य चुकारपणा केल्यास त्याची गत काय होईल ही जाणीव दिली. यात श्रीरामांनी दाखविलेले औदार्य तसेच मित्रास कर्तव्याची जाणीव देणे हे संघटन कौशल्य होय. येथेही त्यांनी विवेकबुद्धी, मानवता, सद्वर्तन व आदर्श मित्रत्व, कर्तव्यतत्परता प्रत्ययास आणून दिली. मैत्रीबरोबरच कडक प्रशासक आहोत ही जाणीव देऊन सन्मित्रत्व अबाधित राखले.

बिभीषण लंकात्यागून त्यांचेकडे आल्यावर त्यांनी त्यास शरणार्थी म्हणून स्थान न देता, एक सन्मित्र म्हणून तर वागविलेच पण त्याही पुढे त्यास श्रीलंकेचा राजा म्हणून

अभिषेक करवून अभय तर दिलेच पण स्वतः राज्याभिलाषी नाही केवळ सीतामुक्ती हेच ध्येय असल्याचे स्पष्ट केले. शत्रूचा शत्रू तो आपला मित्र हे त्यांनी त्याचा मित्र म्हणून अंगिकार करतांना डोळसपणा दखवला. दूरदृष्टी दाखवली व त्याची पारख करूनच विवेकबुद्धीने स्वीकार केला. त्याची अन्याय, अनिती, अप्रमाणिकता, अहंकार इ. गुणांवरील चीड तसेच सद्वर्तन, सद्बूद्धी, सत्चारित्र्य, भगवद्भक्ती इ. ची पारखही केली. त्याची प्रामाणिकता व विश्वासार्हता त्यांनी अजमावली. माणसे पारखून कशी घ्यावीत हा उत्तम गुण त्यांनी प्रत्ययास आणला. श्रीराम आदर्श संघटक होते हे कळते. प्रसंगी वज्रासारखे कठोर तर इतरवेळी कुसुमाहून कोमल असे त्यांचे चारित्र्य/ वर्तन होते.

''अमंत्रम अक्षर नास्ति। नास्ती मूलम नौषधम।। अयोग्यः पुरुषानास्ति। योजक स्तत्र दुर्लभः।'' याप्रमाणे श्रीराम हे एक उत्तम योजक (जे दुर्मिळ असतात) होते व कोणाचा, कधी, कशासाठी कसा उपयोग करायचा हे उत्तमरित्या जाणत होते.

समुद्रावर सेतूबंधनाचे वेळी प्रथम त्यांनी सागरदेवाची प्रार्थना करून विनंती केली. पण जेव्हा समुद्रदेव सहकार्य करत नाही हे प्रत्ययास आल्यावर सागर नष्ट करण्यासाठी धनुष्य प्रत्यंचा ताणून तिचा भयंकर नाद उत्पन्न करून अस्त्र योजना करण्यास सिद्ध झाले. तेव्हा समुद्रदेवाची अहंकार, भ्रांती नष्ट होऊन त्याने क्षमायाचना करून सहकार्याचे अभिवचन देताच कारुण्यनिधी दयार्णव रामांनी त्यास क्षमायाचनेचे दान क्षमा करून दिले व आपला कार्यभाग सिद्ध केला. येथेही त्यांनी विवेकबुद्धी, संयम व रणनीती दूरदर्शीपणा दिसतो. अकारण शत्रुत्व त्यांनी कधीच केले नाही.

श्रीलंकेच्या भूभागावर वानरसेनेसह दाखल झाल्यावरही त्यांनी लगेच रणसंग्राम सुरू केला नाही हे लक्षात घ्यावे. अकारण संहार त्यांना नको होता म्हणून त्यांनी प्रथम अंगदास शांतीदूत म्हणून पाठवून सुयोग्य संदेश दिला. पण अहंकाराने मतीभ्रष्ट रावणाने त्यास प्रतिसाद न देता उन्मत्त उत्तर दिले. तेव्हाच रणसंग्राम अटळ जाणून त्यांनी सेनासिद्धता व रणनीति व्यूहरचना केली. यासंबंधी मी पाहिलेल्या गढवाल शैलीतील सासबहू मंदिर (सहस्त्रबाहू मंदिर खरे नाव) येथील एक चित्राची आठवण येते व त्यासंबंधी त्रोटक माहिती देणे मला योग्य वाटल्याने ती देत आहे. शत्रूत्व केव्हा विसरावे व केव्हा लढा द्यावा याची नीति हीच धर्मरणनीती हा गुण श्रीरामांमध्ये होता याचेच उदाहरण हे चित्र आहे. या चित्रात रामेश्वर येथे रावणावर विजय प्राप्तीसाठी प्रभू रामचंद्र शिवलिंग प्राणप्रतिष्ठा पूजा करत असून त्याचे पौरोहित्य ब्राह्मण वेशात रावण करीत आहे असे दाखविले आहे. ते विचारणा केली असता यासंबंधी सांगण्यात आले ते असे की श्रीरामांना शिवशंकराकडून सांगण्यात आले की साक्षात रावणावर विजय मिळवून त्याचा पूर्ण विनाशासाठी त्यांनी शिवलिंग प्राणप्रतिष्ठा रामेश्वरी करून मगच लंकेकडे कूच करावे. त्यावर श्रीरामांनी त्यांना विचारले की त्यासाठी ब्राह्मण हवा पण मी

क्षत्रिय व माझी सेवा वानर, अस्वल इ. ची. तेव्हा शिवशंकरांनी सांगितले की माझा भक्त दशग्रंथी ब्राह्मण आहे. पण तुझाच शत्रूही आहे. त्याला मी पाठवतो दोघांनाही अट घालतो की पूजाविधान प्राणप्रतिष्ठा पूर्ण होऊन तो स्वस्थानी परत जाईपर्यंत तुम्ही वैर विसराचे. त्याप्रमाणे रावणास पाठवून शिवलिंग प्राणप्रतिष्ठा करण्यास त्यास पौरोहित्य करावे असा आदेश शिवशंकरांनी दिला व शिवलिंग प्राणप्रतिष्ठा करून रामाहाती, रावण परत लंकेस गेला. अशी ही कथा केव्हा कार्यसिध्यर्थ वैरभाव विसरावा या गुणाचे प्रतिक जो येथे कळून येतो.

प्रत्यक्ष युद्धप्रारंभानंतर रावणाचे अनेक महाबलाढ्य वीर व पुत्र यांचा संहार झाला तरी मन मदोन्मत्त रावण अहंकाराने आंधळा झाल्याने युद्ध करत राहिला. महाबलाढ्य बंधू कुंभकर्णाचाही बळी गेला तरीही रावणाची गुर्मी उतरली नाही. कुंभकर्ण महानिद्रेत असायचा पण असे वाचण्यात आले आहे. एका नाथपंथीय मासिकाचे जुन्या दिवाळी अंकात (१०-१२ वर्षापूर्वीचा अंक-नाव स्मरत नाही. क्षमस्व) की तो योगनिद्रेत असायचा कुंडलिनी शक्तिद्वारे. त्यामुळे त्यांचे अंत्यसमयी श्रीरामांनी लक्ष्मणास त्याचे हे रहस्य जाणण्यासाठी त्याचे जवळ पाठविले असता त्यांनी लक्ष्मणास हे रहस्य सांगितले. विस्तारपूर्वक ज्याचा एक ग्रंथ ''कुंडलिनी तरंगिणी'' म्हणून नवनाथसंप्रदायात प्रसिद्ध आहे. शत्रूकडूनही ज्ञानप्राप्ती करणे हा मनाचा मोठा गुण श्रीरामांजवळ होता. शिवाय कुंभकर्णाचा रावणास सीतामनी विरोध होताच पण केवळ ज्येष्ठबंधू आज्ञा म्हणूनच नाईलाजास्तव त्याने रणसंग्राम केला व धरातिर्थी पडला. त्याची सात्त्विकता व साधना बिभिषणाकडून कळल्यानेच त्यांचे जवळील ज्ञानसंपादनार्थ लक्ष्मणास पाठवून श्रीरामांनी वैरमर्यादा कुठपर्यंत असावी याचा आदर्श टेवला व गुणग्राहकता कशी असावी याचा आदर्श घालून दिला. ''मरणान्तानी वैराणी'' हा त्यांचा स्वभाव व नीतिधर्म यात दिसतो.

याच रणसंग्रामात एकदा रावणालाही विरथ करून पराभूत केले. पण त्यास अस्त्रशस्त्रहीन म्हणून सोडून देऊन परत तयारीनिशी युद्धास येण्यास सांगून त्याला अपमानित स्थितीत जीवदान देतांना श्रीरामांनी क्षात्रधर्म व रणनीतिधर्म पालन केला. गैरफायदा घेतला नाही. यामागे दोन हेतू होते. त्यास जाणीव व्हावी आपल्या चुकीची व अहंकार त्यागून त्याने सीता परत करून शरण यावे व इष्ट बलाची कल्पना आल्याने युद्ध संपवून विनाश टाळावा व दुसरा त्याने पुनः सज्ज होऊनच युद्धास यावे व रणसंग्राम करून वीरगती प्राप्त करावी वा जिंकावे. हे विवेकसंपन्न औदार्य श्रीरामच दाखवू शकतात.

इंद्रजिताने प्रयोगित शक्तिद्वारे अनुज लक्ष्मण बेशुद्ध झाल्यावर संजीवनी बुटीद्वारे त्यास शुद्धीवर आल्यावर परत इंद्रजीत मायावी शक्तिद्वारे अदृश्य होऊन युद्ध करण्यासाठी करीत असलेल्या यज्ञाचा विध्वंस करून लक्ष्मणाद्वारेच त्यास मृत्यू दिला व हे दाखवून दिले की जर तू मायावी शक्तीचा आधार

घेतला नाहीस तर माझा अनुज तुझ्यापेक्षा सरस बलशाली आहे स्वतः त्यांनी यावेळी युद्ध न करण्यामागे हाच हेतू होता.

सरतेशेवटी रावणाचा वध केल्यावर तो मृत्यूपंथास लागून अंतिम क्षण मोजत असतानांही त्यांनी रावणाकडून राज्यकारभार कसा करावा याचा उपदेश घेतला, कारण रावण दशग्रंथी ब्राह्मण विद्वान, सर्व शास्त्र पारंगत उत्तम राजकर्ता होता. फक्त स्त्रीलालसा व अहंकार यांनी त्याच ऱ्हास झाला हे श्रीराम जाणत होते. त्यामुळ रावणाकडून राजनीतिचे पाठ घेण्याचा हा रामाचा गुण म्हणजे शत्रूचाही योग्य गुणगौरव करणारा आदर्श आहे. वैराचे कारणापुरतेच वेर एवढा संदेश त्यातून मिळतो. ही प्रभूरामचंद्रांची गुणग्राहकता वृत्ती व वैराची मर्यादा स्पष्ट करणारी आदर्श निती.

रावणाचा अग्नीसंस्कारही त्यांनी बिभीषणाकडून करविला व त्यातही कुळाची रीतिरिवाज परंपरा राखली.

बिभीषणास राज्यभिषेक केला व लंकेचे राज्य त्यास दिले. सीतेचाही अग्निदिव्य करणेस लावल्यानंतर स्वीकार केला. 'शुद्धता' चारित्र्याची सिद्ध केल्यानंतरच. श्रीरामांनी जरी सीता शुद्धत्वाची खात्री होती तरी एक जननायक म्हणून सर्वांची खात्री पटविणे भाग होते कारण त्यामुळेच कोणताही किंतु/संशय जनमानसात राहिल्यास त्याचे रुप/व्याप्ती वाढत जाऊन अनिष्ट परिणाम झाले असते. प्रतिमा मलीन होणे जननायकास पदभ्रष्ट करते. त्याचे आदरणीय स्थान, लौकिक नष्ट होतो हे श्रीराम जाणत होते. व्यक्तिपेक्षा समाज महत्त्वाचा व त्याचा विश्वास, आदर अबाधित ठेवणे हे प्रथम कर्तव्य राज्यकर्त्याचे असते हा आदर्श यातून घ्यावा.

अयोध्येस परतल्यावर श्रीरामांचा राज्याभिषेक सोहळा पार पडला. श्रीरामांनी तरीही जनमानस जाणण्यासाठी गुप्तचर यंत्रणा राबवतांनाच स्वतःही वेष पालटून त्यात सहभाग घेतला. अखंड सावध असावे राज्यकर्त्यांनी हे ते जाणत होते. त्यात आपल्याबद्दलचे रजकाचे मत ऐकून त्यांनी सीतात्यागाचा कठोर निर्णय घेतला कारण केवळ अयोध्येचे नागरिक प्रथम अग्निदिव्याचे वेळी हजर नव्हते म्हणून पुन्हा अग्निदिव्य करावयास लावणे हे त्यांना अयोग्य अन्यायी वाटले. मग प्रत्येक नगरी हेच राज्यभर करत बसणे सर्वथैव अयोग्य. शिवाय मी प्रथम राजा नंतर पती हा निर्णय त्यांना राजनीती शास्त्राप्रमाणे उचित वाटला. राजधर्म पतीधर्मापेक्षा श्रेष्ट आहे हे त्यांनी जाणूनच तिचा त्याग केला. कर्तव्यात कोणते कर्तव्य उचित व प्रथम व त्यासाठी इतर भावना/ कर्तव्य त्याग आवश्यक हे उत्तम राज्यकर्ताच जाणतो व तोच त्याचा खरा राजधर्म असतो त्याचा आदर्श ठेवला. पतीधर्माची मर्यादा व राजधर्ममर्यादा दोन्हीचे पालन केले.

अश्वमेध यज्ञ अश्व वनात लवांकुशाकडून हरण व त्यांचेशी युद्ध करतांना सर्व वीर व बंधू पराभूत झाल्याने स्वतः समरांगणी जाणे. तेथे सीता भेट व सीतेचे भूमीत पृथ्वीत समावणे हे प्रसंग त्यांनी अनुभवले. सीता भूगर्भी गेल्यावर त्यांचा क्रोध

जागृत होऊन ते अस्त्रयोजनेने पृथ्वीच नष्ट करण्यास प्रवृत्त झाले असता, वसिष्ठ/वाल्मिकींनी त्यांना स्वरुपावताराची जाणिव देवून सीमा लक्ष्मीचा अवतार व ती स्वस्थानी त्यांना भेटेल व अवतारकार्य समाप्त झाल्याने राजपुत्रास अभिषेक करून अवतार समाप्त करून मूळस्थानी जाण्याची वेळ आल्याचे सांगताच त्यांचा क्रोध नष्ट होऊन त्यांनी पुढील कार्यभाग निश्चित केला व त्याप्रमाणे कार्यवाही केली, हे उत्तम राजकर्त्याचे लक्षण.

काळपुरुष भेट सुरु असतांनाच विश्वामित्रामुळे हतबल लक्ष्मणाने निरोप सांगण्यासाठी जाणे व देहदंड शिक्षेस सामोरे जावे लागले असतानाच श्रीहनुमंताद्वारे त्यांनी लक्ष्मणाचा त्याग करणे हाच देहदंड देणे असे सांगताच त्यांनी त्याचा त्याग केला व लक्ष्मण शेषावतार असल्याने स्वस्थानी गेले. योग्य सल्लागार असल्याने हा अनर्थ टळला. विवेकपूर्ण निर्णय हा त्यांचा गुण येथे दिसतो.

शरयूनदीत त्यांनी नागरिकांसह प्रवेश करून अवतार समाप्ती करण्याआधी भरत, शत्रुघ्नास स्वस्वरुपी लीन करून रामभक्त हनुमंतास चिरंजीवीत्वाचा वर देऊन रामभक्तरक्षणार्थ जगाचे अंतापर्यंत कार्यरत राहण्याची आज्ञा करून रामभकतांना आधार प्रदान केला व मगच अवतार समाप्त केला. अयोध्येतील भाषिक जनांनाही सोबत सायुज्ज्य मुक्ती देऊन उत्तम राज्यकर्त्याचे हे सर्वोत्तम उदाहरण.

वरील सर्व विवेचनावरून मर्यादा पुरुषोत्तमांचे विविध सद्‌गुण व आचारमर्यादा पालन कळले. त्यामुळेच ते जनमानसात अढळ स्थान प्राप्त करते झाले. लेखांती मी मला त्यांच्या चरित्रात जे प्रमुख गुण दिसले जे सोदाहरण वर दिले आहेत ते पुन्हा येथे उद्‌धृत करतो.

श्रीराम अवतार म्हणजे मानवता, धर्मपालन आज्ञाधारकता, वचनपूर्ती, उत्तम विवेकी राज्यकर्ता/प्रशासक, आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श पती, आदर्श मित्र, आदर्श कर्तव्यापालक, उत्तम नीतिमत्ता, एकपत्नीव्रत, अन्यायाविरुद्ध संघर्ष, विकारांवर ताबा, आदर्श विवेकबुद्धी, उत्तम माणुसकी, उत्तम संघटन कौशल्य, सद्‌वर्तन, सद्‌बुद्धी, उत्तम योजकत्व, शत्रुबद्दलही आदर व गुणग्राहकता, क्षमाशिलत्व, दयाबुद्धी इ. अनेकविध सद्‌गुणांचा संगत व प्रत्येक गोष्टीची मर्यादा जाणून मर्यादाशील जीवन, म्हणूनच मर्यादापुरुषोत्तम या नावाने / विशेषणाने जनमानसात अक्षय आदराचे अढळ स्थान.

या लेखाचे तेच खरे प्रेरणा देणारे व लिहून घेणारे. मी लेखणीरुप. लिहिता लिहता तोच प्रभू श्रीराम. यातील उणिवा माझे नणतेपण. हा लेख मी त्यांनाच अर्पण करून ''कल्याण करी रामराया, जनहीत विवरी'' अशी प्रार्थना करून समाप्त करतो. ''श्रीरामर्पणमस्तु''

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

एक खूप श्रीमंत गृहस्थ होता. इतका श्रीमंत की धनाने मिळणारी सारी सुखे त्याच्यापुढे हात जोडून उभी होती. पण दुर्दैव असे की त्यापैकी एखाद्या सुखाचाही तो आनंद घेऊ शकत नव्हता कारण त्याचे शरीर नाना तऱ्हेच्या व्याधींनी ग्रस्त होते. दहा पावले हळूहळू चालूनही त्याला दम लागत असे, धाप लागत असे. अनेक लोक व्यायाम म्हणून सकाळी फिरण्यासाठी जात असतात तसा तो धनिकही आपल्या घोडागाडीतून फिरण्यासाठी जात असे. तो इतक्या नाजूक प्रकृतीचा होता की गुबगुबीत गादीखाली पडलेली सुईसुद्धा त्याला टोचत असे. सुखाने झोपू शकत नसे. प्रभातकाळच्या मंद-सुखद-शीतल वाऱ्याच्या झुळुकीसुद्धा त्याला सहन होत नसत. त्या मंद समीरण लहरींनीसुद्धा त्याला हुडहुडी भरत असे. म्हणूनच स्वतःला नखशिखान्त कापडवून घेऊनच तो बाहेर पडत असे. मधुमेहामुळे कोणत्याच पक्वान्नाचा-मिष्टान्नाचा तो आस्वाद घेऊ शकत नसे.

विविध व्याधींनी ग्रस्त झालेला, जर्जर झालेला असा हा धनिक एकदा आपल्या घोडागाडीने जात होता. एका शेतात उघड्या अंगानेच एक शेतकरी कष्टांचे काम करीत असलेला त्याला दिसला. त्या श्रेष्ठींनी आपल्या वाहन चालकाला गाडी थांबविण्याचा आदेश दिला. गाडीवानानेही त्याच्या आदेशाचे पालन केले. एका मोठ्या वृक्षाखाली सावलीत गाडी उभी केली. श्रेष्ठी खूप काळ तेथे थांबले होते. त्याच्या दिनचर्येचे निरीक्षण केले व अतिशय आश्चर्यचकित झाले. मध्यान्हीपर्यंत तो अविरत काम करीत आहे असे त्यांनी पाहिले. सूर्य माथ्यावर येताच काम थांबवले. हात-पाय धुवून शेताच्या बांधावरच झाडाखाली बसून घरुन येताना बरोबर आणलेली झुणका-भाकरी, मांडीवरच हाताने फोडलेल्या कांद्यासह खाल्ली. तांब्यातून घटाघटा पाणी प्यायले. थोडावेळ हाताची उशी करून आडवे होत विश्रांती घेतली. पुन्हा सूर्यास्तापर्यंत शेतात काम करीत होता असे त्या धनिकाने पाहिले.

त्याची अशी दिनचर्या पाहून शेटजी अतिशय आश्चर्यचकित झाले. त्यांनी त्या शेतकऱ्याला जवळ बोलावले व त्याला विचारले, ''अरे भल्या गृहस्था, भरपूर कष्ट करून, कदान्न खाऊनही तुझे शरीर धष्टपुष्ट कसे? तू असे औषध तरी काय घेतोस की तुझे शरीर आरोग्य संपन्न व धष्टपुष्ट झाले आहे?'' त्यावर तो शेतकरी उत्तरला - ''महाशय,

परिश्रमी मिताहारः भेषजे सुलभे मम<br>
नित्यं ते सेवमानस्य व्याधिभ्यो मे भयं कुतः?।।

भरपूर परिश्रम (कष्ट) व मोजकाच आहार हीच माझी सहज उपलब्ध असलेली दोन औषधे आहेत. नित्य नियमाने ती औषधे घेणाऱ्या मला रोगांपासून कसली भीती? व त्यामुळेच माझे शरीर आरोग्यपूर्ण व धष्टपुष्ट झाले आहे.''

**श्रीकांत अनंत बर्वे**

## काल भैरव अष्टक

देवराजसेव्यमानपावनांघ्रिपङ्कजं व्यालयज्ञसूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम् ।
नारदादियोगिवृन्दवन्दितं दिगंबरं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। १।।

भानुकोटिभास्वरं भवाब्धितारकं परं नीलकण्ठमीप्सितार्थदायकं त्रिलोचनम् ।
कालकालमंबुजाक्षमक्षशूलमक्षरं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। २।।

शूलटंकपाशदण्डपाणिमादिकारणं श्यामकायमादिदेवमक्षरं निरामयम् ।
भीमविक्रमं प्रभुं विचित्रताण्डवप्रियं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। ३।।

भुक्तिमुक्तिदायकं प्रशस्तचारुविग्रहं भक्तवत्सलं स्थितं समस्तलोकविग्रहम् ।
विनिक्वणन्मनोज्ञहेमकिङ्किणीलसत्कटिं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे।। ४।।

धर्मसेतुपालकं त्वधर्ममार्गनाशनं कर्मपाशमोचकं सुशर्मधायकं विभुम् ।
स्वर्णवर्णशेषपाशशोभितांगमण्डलं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। ५।।

रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं नित्यमद्वितीयमिष्टदैवतं निरंजनम् ।
मृत्युदर्पनाशनं करालदंष्ट्रमोक्षणं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। ६।।

अट्टहासभिन्नपद्मजाण्डकोशसंततिं दृष्टिपात्तनष्टपापजालमुग्रशासनम् ।
अष्टसिद्धिदायकं कपालमालिकाधरं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। ७।।

भूतसंघनायकं विशालकीर्तिदायकं काशिवासलोकपुण्यपापशोधकं विभुम् ।
नीतिमार्गकोविदं पुरातनं जगत्पतिं काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।। ८।।

।। फल श्रुति।।

कालभैरवाष्टकं पठंति ये मनोहरं ज्ञानमुक्तिसाधनं विचित्रपुण्यवर्धनम् ।
शोकमोहदैन्यलोभकोपतापनाशनं प्रयान्ति कालभैरवांघ्रिसन्निधिं नरा ध्रुवम् ।।

।।इति कालभैरवाष्टकम् संपूर्णम् ।।

वेदान्त-तत्त्वज्ञानात, उपनिषदांत, ब्रह्मसूत्रे व अंती कृष्णमुखांतून स्त्रवलेल्या भगवद्‌गीतेत मानवासाठी ब्रह्मप्राप्ती (आत्मज्ञान होणे) हाच सर्वोत्तम पुरुषार्थ सांगितला आहे. 'ॐ तत् सत्'। तत् त्वम् असि। आणि अहं ब्रह्मा अस्मि। या तीन मंत्रातच ब्रह्मसाधनेच्या आरंभापासून अंतिम सिद्धीपर्यंतच्या प्रगतीचा आलेख सामावलेला आहे.

या ब्रह्मांडातील सर्व चराचर दृश्य असले तरी ते सर्व नश्वर आहे, उत्पत्ती स्थिती आणि लय या लयीच्या आवर्तांत बद्ध आहे. मानवी आयुष्याच्या तुलनेत सूर्य आपल्याला शाश्वत, सनातन वाटत असला तरी त्याचे वस्तुमानही (वस्तुमानाचे ऊर्जेत रुपांतर होत असल्यामुळे) सतत घटत आहे. भौतिक शास्त्रज्ञांनी ही त्याच्या आयुष्याचे गणित केले आहे. पण ते आयुष्य अब्जादी वर्षे असल्यामुळे व्यावहारिक दृष्ट्या आपण त्याला शाश्वतच मानतो. 'यावत् चंद्र दिवाकरौ' असा वाक्‌प्रचारही त्यामुळे प्रचारात आहे. या ब्रह्मांडातील (अब्जावधी वर्षांचे आयुष्य असलेले तारेही सतत् उत्पन्न होत असतात तर काही नष्ट होत असतात असे भौतिक शास्त्र सांगते. तात्पर्य हे की या ब्रह्मांडातील सर्व चराचर हे नश्वर आहे, आणि त्या ब्रह्मांडाला निर्माण करणारे 'ब्रह्मतत्त्व' हे एकच (निर्गुण, निराकार आणि इन्द्रियांना अगोचर असले तरी) निरंतर, शाश्वत अनाद्यन्त म्हणजेच सनातन आहे 'ॐ तत् सत्' हे सत्य मनांत पूर्ण ठसले गेले की ब्रह्मप्राप्तीच्या साधनेला मानवाकडून सुरुवात होते. साधनेची प्रगती होत जाते. त्याप्रमाणे हे ब्रह्मतत्त्व सर्व चराचरांना अंश रुपाने व्यापून असल्याची जाणीव साधकाला होऊ लागते.

सर्व भूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।
भ.गी.अ.६/२९

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति।।३०।।

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते।।३१।।

मराठीत -

सर्वभूतीं मला पाही भजे एकत्वबुद्धिने।
सर्वथा वागता नाही योगी माझ्यात तो वसे।।३१।।

ते ब्रह्मतत्त्व सर्वभूतांच्या प्रमाणे आपल्या स्वतःच्या अंतरातही एखाद्या गुहेत लपल्याप्रमाणे गुप्तपणे वसत आहे आणि ते जड, प्राण, मन, प्रज्ञान व आनंदमय अशा पंचकोशांनी वेष्ठिलेले आहे आणि त्याच्याप्रत जाण्यासाठी बाह्योपचारांची नाही तर या पंचकोशांना भेदून अंतर्यात्रा करण्याची गरज आहे व तेथेही ते आत्मतत्त्व (ब्रह्म) चर्मचक्षूंना गोचर नसल्यामुळे ज्ञानचक्षूंनीच अनुभवावे लागणार आहे, यांची 'जाण' साधकाला, साधना प्रगत होत जाते तशी होऊ लागते. म्हणजे एकार्थाने ते 'ब्रह्मतत्त्व' (त्याची तुझ्या

अंतरातच ओळख पटल्यावर) म्हणजे तूच आहेस, 'तत् त्वं असि।' असे मनावर ठसू लागते. शेवटी साधनासिद्धी झाल्यावर मनातला मी, तू चा भेद (द्वंद्व) पूर्णपणे नष्ट होऊन मीच ते ब्रह्म आहे, 'अहं ब्रह्म अस्मि'। असे उद्‌गार आत्मज्ञान झालेल्या साधकाच्या मुखातून निघतात. आदिशंकराचार्यांनीही शिवोऽहं शिवोऽहं असेच उद्‌गार काढले होते.

वरील तिन्ही मंत्रांपैकी 'ॐ तत् सत्' या त्रिपदी पहिल्या मंत्राचाच या लेखात विचार केला जाणार आहे.

या मंत्राचा उल्लेख गीतेच्या १७ अध्यायाच्या २३ व्या श्लोकात आला आहे.

ॐ तत् सत् इति निर्देशः ब्रह्मणः त्रिविधः स्मृतः।
ब्राह्मणाः तेन वेदाःच यज्ञाःच विहिताः पुरा।।२३।।

मराठीत –

झाला निर्देश ब्रह्माचा 'ओम् तत् सत्' त्रिविधा असा।
वेदब्राह्मणयज्ञांचा पूर्वी जन्महि तो असा।।२३

या श्लोकावर ज्ञानेश्वरांनी केलेल्या टीकेचा मथितार्थ अनुष्टुप ज्ञानेश्वरीतील मराठी श्लोकांतच (समजण्यास सोपा असल्यामुळे) देत आहे.

ब्रह्मालाच नसे नाम जाति आकार काहि ते।
वेदांनी खूण पटण्या 'ॐ' नाम तया दिले।।३२९।।

जन्मतः न मुला नाम, ठेविले परि जाइ जे।
मारता हाक त्या नांवें आता तो देइ 'ओ' जसे।।३३०।।

शीणले भवतापाने ज्या नामें लोक त्याकडे।
गाऱ्हाणे करती, 'ब्रह्म' या खुणेनेच ते असे।।३३१।।

भावण्या व्यक्तरूपात 'ब्रह्म' अव्यक्त जे असे।
वेदांनी हा दिला मंत्र, कृपाळू दिव्य दृष्टिने।।३३२।।

ज्ञानोबा म्हणतात, 'ब्रह्मं' हे अव्यक्त निराकार नामरहित आहे, ते व्यक्त स्वरुपात अनुभवास यावे व ते वाचेच्या प्रांतात यावे म्हणून कृपाळू दृष्टीने वेदांनी हा तिहेरी ('ॐ तत् सत्') नाममंत्र शोधून काढला. साधकांना ब्रह्माला आळवण्यासाठी वेदांनी ही मोठीच सोय करून ठेवली आहे.

यज्ञ-दान-तप वगैरे सत्कृत्ये करताना साधकांनी या तीन नामांचा विनियोग कसा करावयाचा, हे गीतेच्या १७ व्या अध्यायाच्या पुढील २४, २५ आणि २६ या तीन श्लोकात सांगितले आहे.

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञ दान तपः क्रियाः।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्।।२४।।

मराठीत –

ओंकार हाच उच्चार ब्रह्मवादी करीतची।
यज्ञ-दान-तपे-कर्मे याच मंत्रें अनुष्ठिती।।२४।।

यज्ञ दान तप इ. शास्त्रप्रणीत सत्कर्मे करण्यापूर्वी साधकाने ध्यानयोगाने ॐकार मनात ठसवावा आणि नंतर त्याचा वाचेने उच्चार करूनच कर्माला आरंभ करावा. थोडक्यात ॐ चा वाचेने उच्चार करून ब्रह्माला आळवून त्याचे ध्यान करूनच

कोणत्याही सत्कर्माला आरंभ करावा असे या श्लोकांत गीता सांगते.

पुढे 'तत्!' चा विनियोग कसा करावा हे पुढील २५ व्या श्लोकांत सांगितले आहे.

तो श्लोक असा आहे -

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपः क्रियाः।
दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकांक्षिभिः।।२५।।

मराठीत -

'तत्' या म्हणून शब्दाने यज्ञदान तपादि जी।
फलाशा सोडता कर्मे मुमुक्षू करतीच ती।।२५।।

या श्लोकावर ज्ञानोबांनी केलेल्या टीकेच्या ओव्यांचा सद्यभाषेत अनुष्टुप श्लोकांत अनुवाद असा आहे -

परब्रह्मचि जे आहे मायेच्याही पलीकडे।
सर्वदर्शी असे जेची 'तत्' शब्दें जाई दर्शिले।।३६९।।

मूळ कारण विश्वाचे ध्यानीं ऐसे स्मरून ची।
अर्जुना, जाणते त्याचा करती जप स्पष्ट ची।।३७०।।

म्हणती 'तत्' - रुपी ब्रह्मा असो अर्पण सर्व ते।
आम्हाला भोगण्यासाठी नको ते काही ऊरुदे।।३७१।।

त्या ततरुपी ब्रह्माला सर्व कर्मे समर्पूनी।
'न मम' म्हणुनी कर्मा, फलही देति सोडुनी।।३७२।।

आरंभलेच ॐ कारें तत्कारानेच अर्पिले।
ब्रह्माला, कर्म निःसंगे, ब्रह्मरुपचि होइ ते।।३७३।।

ॐ तत् या दोन शब्दांनी कर्म आरंभिलेच जे।
ब्रह्मरुपचि झाले जे, ते 'प्रशस्त' चि वर्णिले।।३७८।।

ज्ञानोबा म्हणतात, 'ॐ चा उच्चार करून आरंभलेले कर्म 'तत्' चा उच्चार करून 'इदं न मम' या वृत्तीने कर्मफलसंगाविना पार पाडले तर ते ब्रह्मरुपच होऊन जाते आणि अशा कर्माचे वर्णन 'प्रशस्त' या शब्दाने केले जाते.

वरीलप्रमाणे कर्मयोगाच्या युक्तीने कर्म पार पाडले तरी त्यात 'मी कर्ता' ही भावना (द्वैत) कर्त्यात थोडीशी उतेच! आणि जोवर ही द्वैत भावना कर्त्याच्या मनात नांदत असते तोपर्यंत संसार-भय- काळजी काही केल्या सुटत नाही. म्हणून कर्तृत्वाच्या अभिमानाने जे ब्रह्म आपल्यापासून निराळे (पर) वाटते, ते आत्मतत्त्वाने (आपल्याच स्वरूपाने( (द्वैत नष्ट होऊन) प्रत्ययास यावे म्हणून वेदांनी 'सत्' हा शब्द योजून ठेवला आहे.

'सत्' शब्दाचा विनियोग गीतेच्या (अ.१७) २६ व्या श्लोकात सांगितला आहे.

सद्भावे साधुभावे च 'सत्' इति एतत् प्रयुज्यते।
प्रशस्ते कर्मणि तथा 'सत्' शब्दः पार्थ युज्यते।।२६।।

मराठीत -

अस्तित्व साधुभावाला ज्ञानी म्हणति 'सत्' असे।
प्रशस्त कर्मास्तवची योजिती तोच शब्द ते ।।२६।।

या श्लोकावर ज्ञानोबांची टीका अनुष्टुपश्लोकांत पहा.

ॐ नि तत् यांनी जे कर्म, ब्रह्मरुपचि होतसे।
तेही जाऊन पचले होई 'सत्' रुप ते जसे।।३८४।।

विनियोगचि अंतस्थ सत् शब्दाचा असा असे।
श्रीकृष्ण म्हणती ऐसे, मी नाही बोलतोच हे।।३८५।।

म्हणेन जर मी म्हटले, द्वैतभावचि उद्‌भवे।
म्हणून भगवंताचे मानावे वच हे बरे।।३८६।।

आता 'सत्' हाचि जो शब्द, कर्माला जेचि सात्विक।
उपकारक होई तो, प्रकारे एक आणिक।।३८७।।

अधिकारपरत्वेची सत्कर्मे होत राहती।
उद्‌भवे हीण त्यांच्यात काही कारण हो तरी।।३८८।।

वैगुण्याने तसे होई सत्कर्मही असत् असे।
येताची 'सत्' सहाय्यासी, ऊर्जा कर्मास लाभते।।३९०।।

जैसे औषध रुग्णाचे रोग वा व्यंग काढते।
तैसे 'सत्' शब्द कर्माचे, करी हीणत्व नाहिसे।।३९२।।

तैसे काही प्रमादाने मोडुनी निधिला जर।
कर्म सोडूनि मर्यादा, लागे दुर्मार्गीं ते जार।।३९४।।

तेव्हा 'ॐ तत्' हुनी श्रेष्ठ, 'सत्' चा वापर होतसे।
कर्माला जोडता तोची त्याला साधुत्व येतसे।।३९७।।

लोहा परीस स्पर्शावा, ओढा गंगेस मीळता।
शिंपाने अमृत जैसे, मृतदेही जसे कदा।।३९८।।

तैसे 'सत्' शब्द उच्चारें लाभे कर्मास गौरव।
सदोष कर्मही होई, पार्था त्यानेच निर्मळ।।३९९।।

विचार करसी पार्था 'सत्' नामाचाच तू असा।
सत् असेची परब्रह्म, येईल प्रत्यया तुझ्या ।।४००।।

जेथून सर्व ब्रह्मांड उद्‌भवे स्थान जे असे।
'ॐ तत्सत्' हाचि उच्चार, साधका पोंचवी तिथे।।४०१।।

तत् शब्द उच्चारुन कर्मफलसंगाविना, 'मी कर्ता' हा भाव टाकून सत्कर्म करावे, असे जरी म्हटले असले, तरी या न्यायाप्रमाणे साधकाकडून कर्मामध्ये काही त्रुटी रहाण्याची शक्यता असते. बरेच वेळा काही भौतिक भोग मिळण्यासाठीच यज्ञ-दानादी सत्कर्मे केली जातात. कर्मफलाची इच्छा न ठेवता सत्कर्मे केली तरी 'मी कर्ता' हा भाव साधकाच्या मनात लपलेला राहू शकतो. याप्रमाणे ॐ तत् म्हणून साधकाने केलेल्या कर्मात काही 'हीण' राहू शकते आणि असे 'हीण' 'सत्'च्या उच्चाराच्या परीसस्पर्शाने नाहिसे होते. म्हणून कर्म संपन्न होताना 'सत्' चा उच्चार करून ते कर्मच साधकाने ईश्वराला (ब्रह्माला) अर्पण करून ठाकावे.

पुढे या तिहेरी ब्रह्मनामाचा महिमा ज्ञानोबा वर्णन करतात.

समूह तीन वर्णांचा नाम केवळ हे नसे।
परब्रह्माचि प्रत्यक्ष जाणावे 'नाम' हे असे।।४०५।।

तप दान नि जे यज्ञ न राहो न्यून त्यांतच।
यथासांगचि संपन्न व्हावे तरि म्हणूनच।।४०६।।

ब्रह्मार्पित कर्मे ती होती ब्रह्मचि ती खलु।
'सत्' शब्द साधकालाची परिस स्पर्श तो जणु।।४०७।।

नद्या सिंधूस मिळता जैसा त्यांच्यात भेद ना।
ब्रह्मार्पित तसे कर्मीं उणे-पूर्णचि भेद ना।।४०८।।

प्रयोग 'सत्' या शब्दाचा होई कर्मामधेच ज्या।
अनुष्ठानचि वेदांचे राही कर्मामधेच त्या।।४१३।।

याप्रमाणे 'ॐ तत् सत्' या ब्रह्माच्या तिहेरी नामाचा महिमा भ. गीतेच्या १७ व्या अध्यायात वर्णन केला आहे. सत्कर्माला आरंभ करण्यापूर्वी 'ॐ' चा, ते कर्म करत असताना 'तत्'चा आणि ते कर्म संपन्न होताना 'सत्' च्या उच्चाराने विनियोग केल्याने त्या कर्माचे कर्मत्वचं नाहिसे होते. त्या कर्माचा कोणताही बंध न राहता ते कर्म ब्रह्मकर्मच होऊन जाते. असे गीता सांगते.

**उपसंहार**

ॐ तत् सत् या तिहेरी ब्रह्मनामाच्या वर सांगितलेल्या विनियोगात कर्मयोगाचीच तीन तत्त्वे अप्रत्यक्षपणे सामावलेली आहेत.

१) परमेश्वर (ब्रह्म) माझा पिता मालक सर्व काही आहे. मी त्याचा सेवक व प्रतिनिधी म्हणून काम करीत आहे. माझ्यापुढे आलेले कर्तव्य कर्म हे त्यानेच माझ्यासाठी योजलेले आहे आणि मी त्याच्या आज्ञेनेच त्याच्यासाठीच ते करीत आहे. त्यांत माझे कतृत्व नसून कर्ता करविता केवळ परमेश्वरच आहे. या भावनेने कर्मयोग्याने कर्माला आरंभ करावयाचा असतो. कर्माला आरंभ करण्यापूर्वी ॐ च्या उच्चाराने हीच 'जाण' कर्मयोग्याच्या मनात जागृत होते.

२) वरील जाणीव ठेवून कर्मयोग्याने हाती घेतलेले कर्म कोणत्याही कर्मफलाची आशा न ठेवता पार पाडावयाचे असते. हीच जाणीव कर्मयोग्यात 'तत्'च्या उच्चाराने जागृत होते.

३) कर्म संपन्न झाल्यावर कर्मयोग्याने त्या कर्माचे फल आणि ते कर्मही (इदं न मम या न्यायाने) परमेश्वरालाच अर्पण करावयाचे असते. कर्म संपन्न झाल्यावर 'सत्'चा उच्चार करून कर्मयोग्याने हेच साध्य करावयाचे असते.

निर्गुण निराकार अनामिक ब्रह्मतत्वाला 'ॐ तत् सत्' हे तिहेरी नाम देऊन वेदांनी कृपाळू होऊन मानवाला जणू कर्मयोगाचाच उपदेश केला आहे!

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

•••

आपण शंकर महादेवाच्या गळ्यात घातलेली रुद्राक्षाची माळा पाहिलीच आहे. पण ह्या रुद्राक्षाचे किती तरी प्रकार आहे ह्याची ओळख करून घेणे कठीण. रुद्राक्ष धारण केल्याने जटील रोग पण ठीक होऊन जातात. कोणतीही व्याधी उत्पन्न होत नसते. आता हा रुद्राक्ष किती आकारामध्ये असतो हे पाहणे आहे.

**१) एक मुखी रुद्राक्ष**

ह्या रुद्राक्षाला शिव स्वरुप मानले गेले आहे. ह्याची प्राप्ती फार दुर्लभ आहे. सूर्य उपासने करता ह्याला धारण केले जाते. ह्या रुद्राक्षाला पांढऱ्या रंगाच्या धाग्यात 'ॐ नमः शिवाय' ह्या मंत्राने जपून गळ्यात धारण करावे.

**२) दोन मुखी रुद्राक्ष**

ह्याचे रुप अर्धनारीश्वर स्वरुपाचे आहे. ह्या रुद्राक्षाला लाल रंगाच्या धाग्यात सोमवारच्या दिवशी 'अर्धनारीश्वर देवाय नमः' ह्या मंत्राचा जाप करून धारण केल्यास मानसिक तणाव दूर होऊन शांती मिळते.

**३) तीन मुखी रुद्राक्ष**

ह्या रुद्राक्षाचा स्वामी अग्नी देवता आदि मंगळ असणाऱ्या व्यक्तींनी जर धारण केला तर मनात असलेली हीन भावना आत्मशांती भय व मानसिक तणाव दूर होतो. 'ॐ नमो नंदी नारायणाय नमः' ह्या मंत्राचा जाप करून धारण करावे.

**४) चार मुखी रुद्राक्ष**

ह्या रुद्राक्षाचा स्वामी ब्रह्मा असून संचालक ग्रह बुध आहे. लाल रंगाच्या धाग्यात ओवून बुधवारच्या दिवशी 'ॐ ब्रह्मदेवाय नमः' ह्या मंत्राचा जाप करावा व धारण करावे.

**५) पांच मुखी रुद्राक्ष**

ह्या रुद्राक्षाचा स्वामी प्रत्यक्ष शिव आहे. ह्याचे नियंत्रण बृहस्पती ग्रह आहे. लाल रंगाच्या धाग्यात १ ते ३ ह्या प्रकारे ओवून 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र जपून धारण करावे. मानसिक तणाव दूर होतो.

**६) सहा मुखी रुद्राक्ष**

ह्या रुद्राक्षाचा स्वामी कार्तिकेय असून संचालक ग्रह शुक्र आहे. रक्तपात, मानसिक तणाव, हृदयरोग ह्या बीमारीवर रामबाण आहे. ह्याला लाल रंगाच्या धाग्यात १ ते ३ ह्याप्रमाणे ओवून 'ॐ नमः शिवाय' ह्या मंत्राने जप करून धारण करावे.

**७) सात मुखी रुद्राक्ष**

ह्या रुद्राक्षाची स्वामी श्री महालक्ष्मी असून शनी ग्रह द्वारा संचालित असून आर्थिक शारीरिक व मानसिक तणाव असणाऱ्या लोकांनी लाल धाग्यात घालून 'ॐ श्री देव्यै नमः' ह्या मंत्राचा जाप करून गळ्यात किंवा डाव्या हाताच्या खांद्याला बांधावे.

### ८) आठ मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचे स्वामी श्री गणेश देवता असून ह्याचे संचालक ग्रह राहू आहे. हा रुद्राक्ष धारण केल्यास आपले मनमुटाव, द्वेष असलेल्या व्यक्तीचे मन परिवर्तन होते. लाल धाग्यात ओवून 'ॐ गं गणपतये नमः' ह्या मंत्राचा जाप करून धारण करावे.

### ९) नऊ मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचा स्वामी दूर्गा असून व संचालक ग्रह केतू आहे. लाल धाग्यात ओवून सोमवारी 'ॐ दुं दूर्गायै नमः' हा मंत्र जाप करून धारण करावे. हा रुद्राक्ष धारण केलेल्या व्यक्तीमध्ये सहनशीलता, कर्मठता इ. गूण आढळतात.

### १०) दहा मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचा स्वामी दशावतार विष्णू देवता आहे. ह्या रुद्राक्षाची नियमित पूजा केल्यावर ग्रह शांती मिळते. लाल धाग्यात ओवून 'ॐ नमो भगवते वासूदेवाय' ह्या मंत्राचा जाप करून धारण करावे किंवा डाव्या खांद्यास बांधावे.

### ११) अकरा मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचे स्वामी मारुती देवता आहे. ह्याच्यामुळे निर्णय घेण्याची क्षमता वाढते. व्यापारात दश मिळते. लाल किंवा पिवळ्या रंगाच्या धाग्यात ओवून सोमवारी सूर्योदयापूर्वी मारुतीचे स्तोत्र म्हणून धारण करावे.

### १२) बारह मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचा स्वामी सूर्य देवता. पिवळ्या रंगाच्या धाग्यात ओवून सूर्योदयावेळी 'ॐ घृणि सूर्याय नमः' हा मंत्र म्हणून धारण करावे. व्यापारी वर्ग राजनीतीज्ञ इ. साठी हा उपयुक्त आहे.

### १३) तेरा मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचा स्वामी कामदेव आहे. लाल किंवा पिवळ्या रंगाच्या धाग्यात ओवून 'ॐ वज्र हस्ताय नमः' हा मंत्र जाप करून धारण करावे.

### १४) चौदा मुखी रुद्राक्ष

ह्या रुद्राक्षाचा स्वामी निलकंठ आहे. हा रुद्राक्ष दुर्लभ असून ह्याची तुलना देवमणी रुपात केली आहे. लाल धाग्यात ओवून 'ॐ नमः शिवाय' ह्या मंत्राचा जाप करून मग धारण करावे.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे वरील कोणताही मुखी रुद्राक्ष प्राप्त करणे कठीण. जरी उपलब्ध झाला तरी मनाची खात्री करूनच वापर करावा.

**प्रभाकर दत्तात्रय गोडबोले**
फडनीस गल्ली,
चमत्कारी मंदिराजवळ,
लश्कर, ग्वालियर – ४७४००१
भ्रमणध्वनी : ८९८९४७५५१९/
९४०७००५७६४

•••

## प्राचीन ऋषींचे मानव जातीला उपकारक मौलिक संशोधन

डॉ. प्रभाकर आपटे

प्राचीन काळी ऋषींनी तपोबलाने किती तरी क्षेत्रात मूलभुत संशोधन करून ठेवले आहे. ते आपण न कळत अनुभवतो. पण त्याचे मोल आपल्याला उमगत नाही.

सर्वप्रथम धार्मिक विधींच्या वेळीचे पुण्या हवाचन त्यावेळी गुरुजी सांगतात ते आपण पोपटपंची करत म्हणतो. त्यात कल्प-युग इ. ची गणना करत अद्य अमुक दिवसे अमुक नक्षत्रे त्यात वार तिथी मास, ऋतु, अयन असे सगळे कालमापनाचे नेमके घटक येतात. त्यानंतर मेरुपर्वतापासून, भरत खण्डे, भरतवर्षे गोदावर्याः दक्षिणे तीरे असे करीत करीत आपल्या गावापर्यंत स्थलनिश्चित केली जाते. यामागे केवढे विज्ञान सामान्य माणसापर्यंत आणून सोडले आहे ते पहाण्यासारखे आहे. हा संकल्प आपल्या किती पिढ्यांच्या पूर्वजांनी केला असेल. तर हे सांस्कृतिक सातत्य आहे. तीर्थक्षेत्री अनेक पुरोहितांकडे आपल्या वंशावळींच्या नोंदी सापडत असतात. कालगणनेची सुरुवात विष्णोर अनुज्ञया... असा होतो.

तर विष्णु हा एक देव म्हणून नव्हे तर प्राचीन ऋषींच्या परिभाषेत चातुर्मासात विष्णू चार महिने झोपतो तो योगनिद्रेत ऋषींच्या कालगणनेप्रमाणे त्याच्या योगनिद्रेत त्याच्या ठायी एक सिसृक्षा निर्माण होते. स्रष्टुम् इच्छा-सिसृक्षा म्हणजे सृजन करण्याची ऊर्मि. ती म्हणजे एकोऽहम्। बहु स्याम्। तर ती सिसृक्षा त्याच्या नाभीत सुप्त असते. पण चेतना तिला झोपू देत नाही. ती सुप्त असते तेव्हा विष्णूचे ना वासु+देव. हा शब्द दोन धातूंचा बनतो अस्+दिव्. म्हणजे असणे आणि भासणे. विश्वामागील मुलतत्त्व ते असते आणि भासते. वर वासुदेव हा चतुर्व्युहातला पहिला व्युह. पण ती सिसृक्षा प्रकटण्याची धडपड करते. पण देव तिला दडपून ठेवतो. त्या धडपडीचे नांव संकर्षण सम+कर्षण म्हणजे एकत्र दाबून ठेवतानाची ओढाताण. संकर्षण हा दुसरा व्यूह. तर ती सृजनेच्छा जोर करते आणि तिचा दिव म्हणजे प्रकाशणे चमकणे. ती अंधारात एकादी विजेरी प्रकाशझोत पुढे पुढे टाकते आणि माणूस तिच्या प्रकाशात चालतो. त्याप्रमाणे ही सिसृक्षा पुढे प्रकाशझोत टाकते. त्या तिच्या अवस्थेचे नांव प्रद्युम्न. प्र+दिव् ती अजून विष्णूच्या अंतरंगातच आहे. पण प्रकाश मात्र टाकते. तर तिच्या धडपडीला फळ मिळण्याची वेळ म्हणजे ती विष्णूच्या अंतरंगात दडपून राहात नाही. वि म्हणजे गच्च आणि रुद्ध म्हणजे अडवलेली विरुद्ध अवस्था. ती ते कवच फोडते म्हणजे ती अनिरुद्ध अवस्था प्राप्त करते. महणजेच फक्त असणारी आणि भासणारी सिसृक्षा विश्वाच्या रुपाने प्रकट होते. म्हणजे नेमके काय घडते? तर विष्णूच्या नाभितून एक कमळाचा देठ सरळ वाढत वाढत जातो. त्याच्या टोकाशी एक कमळाची कळी निर्माण होते. ती सिसृक्षा तिला आजून ऊर्जा देते आणि सृष्टिरुपी कमल

उमलते. या कमळाला पाकळ्या किती? आठ. ४ दिशा+४ उपदिशा म्हणजे ही स्थळाची मुलसंकल्पना आणि कळीला उमलायचा लागणारा वेळ म्हणजे आद्य काल संकल्पना.

आता त्या कमलकलिकेत विश्वाचे रहस्य दडले आहे. ते म्हणजे चतुर्मुख ब्रह्मा कमळ उमलेल तेव्हा स्थळ आणि काळ साकार होतील. मग ब्रह्मदेवाचे विश्वोत्पत्तीचे कार्य सुरु होईल. ते कमल् तर कळीच राहील तर उत्पत्ति कुंठित होईल स्थलकालाच्या कुंठित अवस्थेचे नाव आहे वैकुंठ.

स्थळाचा विस्तार म्हणजे सात खंड, सात समुद्र आणि सात पर्वत. काळाचा विस्तार म्हणजे कल्प, युग, सहस्रके, शतके, संवत्सर, मास, ऋतु असून इ.इ. आता सृष्टीचे पाच मुलघटक म्हणजे पंचमहाभूतेः पृथ्वी आप तेज वायु आणि आकाश किती पटापट उत्तरे देतो आपण पण ही शोधली कुणी, केंव्हा कशी व का? वर जेव्हा केव्हा शोधली त्याची संख्या ६ पण होत नाही किंवा ४ पण नाही. म्हणजे जे शोध लावले ते त्रिकालाबाधित. त्यानंतर पाच अदृश्य सूक्ष्म रूपे म्हणजे तन्मात्रा. मानवी शरीराची व्याख्या पहा. पंचत्वे निर्मिते देहे। आता देहावसान झाल्यावर ती पांच तत्त्वे पुन्हा त्याला जाऊन मिळतात. पंचत्वं च पुनर्गते। मग जीव ज्यांच्या आधारावर शरीराकडून काम करवून धेतो. ती ज्ञानेंद्रिये पाचः डोळे, नाक, कान, रसना आणि त्वचा ती काय करतात. दर्शन, गंधग्रहण, श्रवण, चव आणि स्पर्श. मग अंतर इंद्रिये, मन बुद्धि अहंकार ही तीन आणि शेवटी, जीवात्मा-पुरुष आणि मूळ प्रकृति. तर ही २५ तत्त्वे इतक्या कालप्रवाहांत तेवढीच राहातात की तत्त्व संख्या =२५ हा संकेतच झाला. आता या सर्वांचा स्वामी म्हणजे ईश्वर.

आता प्रकृतीचे घटक तीनचः सत्व रजस् आणि तमस्। त्यामुळे व्यवहारांत लोक माणसांची विभागणी करतात. सात्त्विक, राजसी आणि तामसी किती मुलभूत कल्पना. पण या प्रथम कुणाला सुचल्या? वैद्यक दृष्टीने प्रकृतीचे घटक तीन. वात् पित्त आणि कफ वैद्य सहजपणे रोगांची वाटणी त्यात करतो आणि औषध योजना करतो. वेगवेगळ्या क्षेत्रात असेच मुलभूत संशोधन चवींचे प्रकार ६च. मधुर-आम्ल-लवण-कटु-कषाय-तिक्त. ५ नाही ७ नाही. संगीताचे सूर ७च सारेगमपधनी. खाद्यांचे प्रकार ४. खाद्य पेय, लेहय आणि चोष्टा. खाण्याजोगे पिण्याजोगे, चोखण्याजोगे आणि चाटण्याजोगे. वाद्यांचे प्रकार चारच. घन, सुबिर, तत आणि अवनद्ध. आयुर्वेद अष्टांग, योग अष्टांग आणि स्थापत्य पण अष्टांग. खाद्यांचे रस ६ तर काव्यातले नऊ.

अशी उदाहरणे विपुल आहेत. तर यांचे मौलिक संशोधन कोणी केले त्यांचे ऋण तरी मानू या.

**– डॉ. प्रभाकर आपटे**
सी-५, ४०१, बुद्धदेव विहार,
हिलगार्डन, ठाणे (प) – ४०० ६१०.
दूरभाषा : ७०२१७७६५१५

•••

संचलनाला सैनिक सुरुवात करतात तेव्हा डावा पाय टाकत असतात. डावा–उजवा याच क्रमाने शिपायांपासून सेनापतीपर्यंत सर्वांचे शिक्षण आणि संचलन असते. पहाटेस जाग आल्यावर बिछान्यावर बसल्या बसल्या

''कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम् ।।''

हा श्लोक म्हणायचा, करदर्शन करायचे, दोन्ही हात तोंडावरुन फिरवायचे आणि नंतर

''समुद्रवसने देवी पर्वतस्तनमंडले ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ।।''

हा श्लोक म्हणत धरणीमातेला नमस्कार करायचा आणि डाव्या पायाची खोट जमिनीवर तीन वेळा आघात केल्यासारखी टेकायची व नंतर अंथरुणाच्या बाहेर पडून उभे रहायचे व दैनंदिन व्यवहार सुरु करायचे अशी पूर्वापार पद्धत होती. 'वामपादेन त्रिस्ताडयेत' हा आचार धार्मिक विधींमध्ये आजही समाविष्ट आहे. नित्य वा नैमित्तिक पूजा वगैरे विधींमध्ये उत्साह कायम रहावा म्हणून पाळला जातो. मोठ्या माणसाला किंवा पुस्तकासारख्या चांगल्या पवित्र वस्तूला पाय लागला तर क्षमायाचनेच्या भावनेने नमस्कार करावा हा संस्कार आहे.

परंतु पहाटे उठल्यानंतर हेतुपूर्वक जमिनीला पाय लावण व चुकलो म्हणणे (पादस्पर्शं क्षमस्व मे) हे काही सौजन्याचे लक्षण नव्हे. आपण निद्रिस्त अवस्थेत असताना आपल्या हृदयाची रुधिराभिसरण क्रिया मंदावलेली असते. अशा स्थितीत झोपेतून उठताक्षणीच एकदम शारीरिक हालचाल सुरु करणे आणि त्यांचे कर्मेंद्रियांकडून पालन यांच्यात असलेली सुसूत्रता निद्रेमुळे मंदावलेली असल्याने तत्परतेने कार्यप्रवण नसते. ध्यानधारणा, पूजा बराच वेळ एके ठिकाणी बसून लेखन केल्यावर जर आपण एकदम उठलो तर आपला तोल जातो हे आपण अनुभवतो. अंथरुणावर असतानाच करदर्शन आणि धरणीला चरणस्पर्श करण्याची प्रथा विचारपूर्वक करण्यात आली असावी.

हा चरणस्पर्श डाव्या पायाने का करावा याचा विचारही अुद्‌बोधक व माननीय आहे. हृदय शरीराच्या डाव्या बाजूला असते. त्याचप्रमाणे संवेदन, प्राणवायूचे संचलन आणि प्रेरणा करणाऱ्या अनुक्रमे इडा, सुषुम्मा व पिंगला उजव्या बाजूला आणि त्या दोहोंमध्ये सुषुम्मा असते. या तीन प्रमुख नाड्या इतर शेकडो नाड्यांच्या सहाय्याने मूलाधार चक्रापासून आज्ञाचक्रामाध्यमाने मेंदूपर्यंत संवेदना पोचविण्याचे व तेथून प्रेरणा पुन्हा मूलाधारापर्यंत पोचविण्याचे व प्राणवायूचे प्रवहन करण्याचे कार्य करीत असतात. इडा नाडी शरीराच्या डाव्या बाजूला आहे हे लक्षात घेतले म्हणजे झोपेतून उठल्यावर शारीरिक व्यवहार सुरु करताना जमिनीवर प्रथम डावे पाउल का ठेवावे हे ध्यानात येईल.

जीवनाचे प्रमुख शक्तिकेंद्र डाव्या बाजूला असल्यामुळे त्याचे महत्त्व सूचित करणारे काही संकेत मननीय आहेत. 'वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा' असे विठ्ठलाचे,

'वामेच जनकात्मजा' असे रामचंद्राचे वर्णन केलेले आहे. शंकराचे स्वरुपच 'जीवनारी नटेश्वर' असे आहे. स्त्रीला वामांगी असे म्हणतात ते यामुळेच. स्त्री ही शक्ती आहे ती शिवाशी, पुरुषांशी एकरुप होइल तरच हा विश्वाचा गाडा सुरु राहील.

केवळ संचलन करतानाच नव्हे, तर आक्रमणाचे वेळीही सैनिक डावा पाय पुढे टाकूनच पवित्रे घेत असतो. शक्तिपूर्वक आक्रमणाचा तोच एक पवित्रा असतो. पहाटे उठल्यावर प्रात-स्मरण करुन बसल्याबसल्याच नमस्कारपूर्वक जमिनीला डाव्या पायाने स्पर्श करुन भूमातेविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा भावनात्मक भाव आहेच. त्या इतकाच महत्त्वाचा, विज्ञानदृष्टया उपयुक्ततेचा भाग आहे, तो असा. सहज सावकाश चालताना, धावताना, उड्या मारताना प्रत्येक पावलागणिक जमीन आपल्याला मदत करीत असते. विश्वाच्या निर्मितीला साधनभूत असलेल्या पंचमहाभूतांपैकी पृथ्वी (जमीन) प्रथम क्रमांकाची आहे. तिच्या सहाय्याशिवाय कोठलीही प्रगति, गती प्राप्त होऊ शकत नाही. जमिनीतून वहाणाऱ्या अत्यंत सूक्ष्म विद्युतशक्तीचा आणि शरीरातील सूक्ष्म विद्युतशक्तीचा संयोग झाला म्हणजेच मानव गतिशील होतो. ही जी भूमिगत शक्ति आहे तिचा भूमीशी असलेला संबंध दुरावतो तेव्हा तिच्या त्या शक्तीचाही संबंध तुटलेला असतो. तो पुन्हा जोडताना सावकाशीनेच जोडावा लागतो. दीर्घकाळ अंतराळात राहिल्यामुळे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीचा, प्रतिक्रियात्मक शक्तीचा, संबंध तुटलेला असतो. तो पुन्हा जोडताना सावकाशीने जोडणे हिताचे असते. आपला देह पार्थिव म्हणजे पृथ्वीतत्वप्रधान आहे. आपल्या शरीरात पन्नास टक्के भाग पृथ्वी तत्वाचा आहे. म्हणून या शरीराशी जमिनीच्या क्रिया-प्रतिक्रियांचा सर्वाधिक निकटचा संबंध आहे. भूमातेच्या संवेदनांच्या प्रतिक्रियेची जाण ठेवल्याशिवाय या पार्थिक देहाला स्वास्थ लाभणार नाही, उत्कर्ष करुन घेता येणार नाही.

दुर्दैवाने आज आपण पृथ्वीपासून दूर जात आहोत, आकाशात रहाण्याची स्वप्ने रंगवीत आहोत आणि ती प्रत्यक्षात आणण्याकरता धडपडत आहोत. फार प्राचीन काळी तपस्येच्या बळावर आपल्या शिष्याला, त्रिशंकूला, अंतराळात नवे नंदनवन बनविण्याचा, दुसरा इंद्र बनविण्याचा प्रयत्न केला गेला होता. पण तो असफल झाला आणि त्रिशंकू अधांतरी लोंबकळत राहिला. पृथ्वीतत्वप्रधान पार्थिव देह पृथ्वीवरच नांदेल वाढेल. आकाशात राहू शकणार नाही. हे विसरुन विज्ञानरुपी विश्वामित्राचे शिष्य बनून आकाशपुष्पांचा आस्वाद लुटण्याच्या मोहाने आपण जमिनीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशा परीस्थितीत मग डॉक्टर सांगतात, जमिनीला विसरु नका अनवाणी होऊन जमिनीवर चाला, हिरवळीवर चाला, आरोग्य लाभेल!

माणसाने जमिनीवरच असावे, जमिनीवरुनच चालावे हे बर! आणि चालायला सुरुवात डाव्या पायाने करावी. त्यामुळे तुमची जीवनविषयक हालचाल सुखदायी होईल!

(संदर्भ : 'सद्धर्म' त्रैमासिक)

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

आधिभौतिक विचार आणि तत्त्वज्ञान बुरसटलेले आहे, त्यामुळे हा समाज 'नीतीभ्रष्ट' व 'मूल्यहीन' झाला आहे. त्याला या दुष्टचक्रातून बाहेर काढायचे असेल; तर त्याचे ख्रिस्तीकरण करणे आवश्यक आहे, आणि हे कार्य भारतामध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांना परवानगी दिली तरच होऊ शकते, हा त्यांचा प्रसार हळूहळू इंग्लंडमध्येही प्रभावी होऊ लागला. त्याचीच परिणती म्हणून १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला राणीने पुन्हा जेव्हा व्यापाराकरता सनद दिली त्यावेळी धर्मप्रसारकांना देखील येण्याची मुभा दिली.

इंग्रजी आणि ख्रिस्ती वसाहतवादाचा गाभा हा वर्ण, संस्कृती श्रेष्ठत्व किंवा अहंकाराशी निगडीत होता. ख्रिस्तीधर्म आणि इंग्रजी भाषा यांच्या माध्यमातूनच या समाजाला सुसंस्कृत करता येईल अशी त्यावेळचे ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासकीय अधिकारी यांची ठाम समजूत होती. वसाहतवादाची सूत्र राणीकडे गेल्यावरही या मानसिकतेमध्ये काडीचाही बदल झाला नव्हता. म्हणूनच १९ व्या शतकामध्ये वसाहतवाद्यांची धोरणे आणि कार्यशैली यांच्या अभ्यासाकरता ही पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे.

अर्थातच वॉरन हेस्टिंग्ज याला हव्या असलेल्या धोरणांच्या बरोबर विसंगत अशी ही मानसिकता होती. हिंदुंचे ख्रिस्तिकरण व्हायला हवे याबाबत एकवाक्यता असली तरी, त्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत मात्र काही मतभिन्नता होती.

काही धर्मप्रसारकांना हे परिवर्तन हिंदूंची प्रमाणभाषा संस्कृत किंवा त्यांच्या प्रांतीय भाषा यांच्या माध्यमातून करणे संयुक्तिक वाटत होते (Orientalist). तर काहींचा मात्र इंग्रजीभाषा, आणि पाश्चिमात्य विज्ञानाच्या माध्यमातूनच हे परीवर्तन होऊ शकेल असा त्यांचा आग्रह होता (Anglicist).

सर विल्यम जोन्स, चार्ल्स विल्किन्स, कोलब्रूक इत्यादींनी हिंदूंचे साहित्य, व धर्मग्रंथांचा अभ्यास करून त्यांची भाषांतरे इंग्रजीमध्ये या सुमारास उपलब्ध केली होती. अर्थातच यामुळे भारतीय संस्कृती ही मागासलेली तर नाहीच पण त्याचा आशय, आणि विचार प्रगल्भ आहे याची जाणीव धर्मप्रसारक, व प्रशासकीय अधिकाऱ्यांना व्हायला लागली. तरीही वसाहतवादाच्या समर्थनार्थ, हिंदु धर्म आणि विचार हे मागासलेले आहेत आणि त्यामध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे या विचारावर आधारीतच प्रशासन, महसूलापासून शिक्षणापर्यंतच्या धोरणांची आखणी व्हायला लागली. काही वर्षांच्या आतच अशा धोरणांच्या अंमलबजावणी नंतरचे परिवर्तन काय होते याची वर्णने पाश्चिमात्य अभ्यासकांनी लिहिलेल्या पुस्तकांमधून आपल्याला पहावयास मिळतात.

रॅमसे मॅक्डोनल्ड आपल्या १९१० साली प्रकाशित केलेल्या "Awakening of India" या पुस्तकात लिहितात.

"In all, attempts to govern a country by a 'benevolent despotism', the governed are crushed down. They become subjects who obey, not citizens who act. Their Literature, their art, their spiritual expression go. They descend to the level of mere limitators and copyist .... When we recall the riches of Indian civilization in the past it becomes plain that the loss of initiative and self-development has been greater in India than in almost any other country" (p.213)

रॅमसे मॅक्डोनल्ड सारख्या अनेक पाश्चिमात्य अभ्यासकांना भारतातील तत्त्वज्ञानच नाही तर इतरही भौतिक विज्ञानातील भारताची प्रगती अचंबित करत होती. तरीही धर्मप्रसारकांना मात्र इंग्रजी भाषा व पाश्चिमात्य विज्ञान यांच्या माध्यमातून भारतीय विचारातील न्यूनत्व दाखवत रहायचे होते. दुर्दैवाने यामध्ये ते मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले.

जॉन मूर (John Muir) हा एक स्कॉटीश, ईस्ट इंडिया कंपनीमधील प्रशासकीय अधिकारी. त्याने संस्कृतभाषेचा अभ्यास केला एवढेच नाही तर त्यावर प्रभुत्व ही मिळवले. भारतामध्ये शैक्षणिक व इतर धोरणांच्या आखणीमध्ये त्याचा सिंहाचा वाटा आहे. तो कटट्र धर्मप्रसारक होता. १८३९ साली 'मतपरीक्षा' हे भारतीय धर्मातील विचारांचा फोलपणा दाखवणारे पुस्तक त्यांनी लिहिले. अर्थातच हे पुस्तक संस्कृतमध्ये लिहिले. यावर तो संस्कृतपंडितांशी वादविवाद करु लागला. सुबाजी बापू या मराठी पंडितांने १८३९ सालीच त्याला 'मतपरीक्षाशिक्षा' हे उत्तरही दिले. हिंदु धर्मावरील हल्ल्याचे हे एक उदाहरण आहे.

धर्मप्रसारकांनी ताबा घेतला होता तो शिक्षण पद्धतीचा. १८३५ सालच्या मेकॉलेच्या शैक्षणिक इतिवृत्ताने (Minutes on Indian Education) या 'धोरण परिवर्तनाला' मोठी गती मिळाली. त्याचे प्रसिद्ध विचार हे पुढील शिक्षण धोरणाचे प्रमुख सूत्र राहिले. मेकॉले म्हणतो –

"We want to create a class of persons, Indian in blood and colour, but English in taste, in opinions, in morals, and in intellect."

सांस्कृतिक वसाहतवादाचा हा मार्गदर्शक आकृतिबंध होता.

भौगोलिक वसाहतवाद संपू शकतो पण सांस्कृतिक वसाहतवाद जनुकांपर्यंत जाऊन पोहचतो. मेकॉलेचे धोरण हे 'शैक्षणिक' वाटले तरी ते 'सांस्कृतिक' होते. आज स्वातंत्र्यांनंतर ७० वर्षांनीही आपण त्यातून मुक्तता करून घेऊ शकलो नाही.

२५०० वर्षापूर्वीचा पाणिनी काय, किंवा १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञ काय, भाषा आणि गणिताच्या क्षेत्रात त्यांचे योगदान एका वेगळ्या प्रतिभेचे द्योतक आहे. कला, स्थापत्य ते भौतिकीच्या अनेक क्षेत्रामध्येही वसाहतपूर्व भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर अशी प्रगती दिसून येते. धार्मिक साहित्य सोडून या विषयावर हजारोंनी हस्तलिखित पोथ्या आज भारतातील आणि परदेशातील

ग्रंथालयात उपलब्ध आहेत. अगदी २३००-२४०० वर्षापूर्वी अलेक्झांडरबरोबर आलेले इतिहासकार असोत की, १६ व्या १७ व्या शतकातील इंग्रज, पोर्तुगीज वसाहतवाद्यांनी लिहिलेली वर्णने असोत, आपल्याला याची अनेक प्रमाणे मिळतात. 'व्यवस्था परिवर्तना' आधिच्या एका सर्जनशील समाजाचे ते प्रतिबिंब आहे.

ही प्रगती ही भारताच्या संतुलित सामाजिक रचनेमुळे होती. त्या रचनेचा पाया हा त्यांचा 'व्यवसाय' आणि 'कौशल्यावर' आधारित होता. मुख्य म्हणजे भारताची सर्व अर्थव्यवस्था ही 'खेडे केंद्रित' होती. प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण होते. प्रत्येक व्यवसाय हा परस्परावलंबी होता. प्रत्येक नागरिकाला त्याच्या व्यवसायाचे 'कौशल्यशिक्षण' हे त्याच्या कुटुंबातच मिळत होते. विकेंद्रित व्यवसाय शिक्षण, की ज्याचे केंद्र हे त्याचे कुटुंब असे, हे भारताच्या व्यवसाय/कौशल्य शिक्षणाचे वैशिष्ठ होते. पंडिती किंवा पाठशालेतील शिक्षणाहून ते वेगळे होते. हे दोनही स्तर व्यापक भारतीय शिक्षण व्यवस्थेचे अविभाज्य भाग होते.

भारताच्या समाजव्यवस्थेला अस्थिरता ही ८ व्या ९ व्या शतकातील इस्लामिक आक्रमणांमुळे यायला लागली. पुढील सात-आठशे वर्षामध्ये या कायम युद्धसदृश परिस्थितीमुळे, या संतुलित समाजव्यवस्थेचे अनेक घटक आणि त्यांची व्यावसायिक कौशल्ये 'कमकुवत' व 'अस्थिर' व्हायला लागली. १६ व्या शतकात वसाहतवाद्यांनी सुरु केलेले 'व्यवस्था परिवर्तन', १९ व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये जवळजवळ पुरे झाले होते. त्याचा केंद्रबिंदू मेकॉलेची शिक्षणपद्धती असली तरी महसूलापासून, शिक्षणापर्यतच्या सगळ्या 'परंपरागत' व्यवस्था मोडीत निघत होत्या, आणि त्यावर सांस्कृतिकदृष्ट्या संपूर्णतया भिन्न असलेल्या पाश्चिमात्य व्यवस्थांचे रोपण होत होते. मेकॉलेला हवा असलेला, 'हाडामासाचा भारतीय पण आचार-विचारांनी पाश्चिमात्य' असा भारतीय या शिक्षण पद्धतीतून बाहेर पडत होता. सुमारे १०० वर्षांपूर्वी म्हणजे १९१७ साली ॲनी बेझंट (१८४७-१९३३) यानी लिहिलेल्या The Case for India यामध्ये याचे अतिशय चपखल वर्णन केले आहे.

"The stunting of the Indian race under British rule begins with the education of the children. The schools (which are under British control) differentiate between British and Indian teacher; the colleges do the same. The students see first class Indian teachers superseded by young and third-rate foreigners : the principals or presidents of colleges must be foreigners: foreign history is more important than Indian : to have written on English villages is a qualification for teaching economics in India: the whole atmosphere of the school and college emphasizes the superiority of the foreigner. The whole education of the country is planned on foreign models, and its object is to serve foreign rather than native ends, to make docile government servants, rather than petriotic citizens. High spirtit, courage,

self-respect are not encouraged and docility is regarded as the most precious quality in the student. Pride in country, patriotism, ambition, are looked down upon as dangerous. English instead of Indian ideals are exalted : the blessings of a foreign rule and the incapacity of Indians are constantly inculcated".

भौगोलिक दृष्ट्या भारत आज स्वतंत्र असला तरी, सांस्कृतिक दृष्टया तो पाश्चिमात्य 'व्यवस्था' आणि 'संस्कृती'चा मांडलिक आहे. इतिहासाची यांत्रिकी आवर्तने किंवा सोईस्कर मांडणी; भविष्य निर्मितीचे स्त्रोत होऊ शकत नाहीत, किंवा इतिहासातील वैभवही परत आणू शकत नाहीत. आजची राजकीय परिस्थिती आणि नेतृत्व सवलती, आणि आरक्षणाच्या कुबड्या देऊन समाजाला 'आत्मसन्मानहीन' करत आहे. ज्या देशामध्ये सोन्याचा धूर निघत होता त्याचे नागरिक आता स्वतःला 'मागासलेले' आहोत म्हणून मोर्चे काढत आहेत, यासारखे दुसरे मोठे दुर्दैव कुठलं? आज ॲनी बेझंट हयात असत्या तर या 'आत्मसन्मान' गमावलेल्या, 'मागासलेपणा'चा आग्रह धरणारा भारतीय बघून, काही लिहिण्याचे त्यांचे धारिष्ट्यच झाले नसते. इंग्रजी शब्दकोषात या परिस्थितीचे वर्णन करणारे शब्दही त्यांना मिळाले नसते.

भारतीय धर्मविचारातील 'चिंतन', आणि 'सर्जनशीलते'ची ओळख काही ख्रिस्ती धर्मप्रसारक, आणि वसाहतवादी नोकरशहांना नक्कीच झाली होती. निदान तसा प्रामाणिकपणातरी आपल्याला त्यांच्या लिखाणातून दिसून येतो. सर चार्ल्स विल्कीन्स यांनी १७८५ साली भगवत्‌गीतेचे पहिले इंग्रजी भाषांतर केले. वॉरन हेस्टिंग यांची त्याला एक सुंदर प्रस्तावना आहे. त्यामध्ये ते म्हणतात–

"The writers of the Indian philosophies will survive when the British Dominion in India shall long have ceased to exist, and when the sources which it yielded of wealth, and power are lost to remembrance."

आपल्या धार्मिक उत्सवांचे 'व्यावसायीकरण', आणि 'विकृतीकरण' करणाऱ्या आपल्या राजकारण्यांच्या मानसिकतेमध्ये याचा लवलेशही नसावा, हीच आजची खरी शोकांतिका आहे.

•••

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१